स्नेह भोज
स्वाद दिल से दिल तक !
बारसे, होहाळे जेवण, साखरपुडा, गेट टू गेदर
अश्या छोटेखानी समारंभांसाठी
परफेक्ट हॉल आणि सोबत
स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये
सुटसुटीत कार्यक्रम
रुचिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहमदनगर
86 98 8080 88

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. १८.०६.२०२४ | अंक नं. ०९२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६९ वे | ANR/022/2018-2020

होय..आम्ही घेतोय आपल्या डोळ्यांची काळजी..
ऑटोमॅटिक्स्टकडून डोळ्यांची दर्जेदार मोफत तपासणी
एकदा अवश्य भेट द्या व खात्री करावी
नंबरचा चष्मा फक्त रु. 299 रुपयात
प्रोग्रेसिव्ह चष्मा फक्त रु. 900 रुपयात
ब्लूकट चष्मा फक्त रु. 500 रुपयात
अहमदनगरचे सुप्रसिध्द
अंजली चष्मावाला
पत्ता : शिवशक्ती कॉम्प्लेक्स, पटेल मेडिकलजवळ, चितळेरोड, अहमदनगर, मो : 8796824353

स्पेशलिटीज आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222225
नारायणगाव (02132) 242132

नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर इमामपूर घाटात अपघात होवून रस्त्यावर उलटलेला कंटेनर व ठप्प झालेली वाहतूक.

कंटेनर उलटून अपघात; एकाचा मृत्यू, १ जखमी; छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक ठप्प

नगर – नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नगर तालुक्यातील इमामपूर घाटात मंगळवारी (दि. १८) सकाळी ९०.१५ च्या सुमारास कंटेनर रस्त्यावर उलटून भीषण अपघात झाला. या अपघातात कंटेनर खाली सापडून दुचाकीस्वार ठार झाला तर त्याची मुलगी जखमी झाली आहे. डांबर भरलेले पिंप असलेला कंटेनर घाटात रस्त्यावरच आडवा झालेला असल्याने दुपारी उशिरा पर्यंत या महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

अपघातात नेवासे तालुक्यातील खरवंडी येथील अनिल दगडू फाटके (वय ४०) हे मयत झाले असून त्यांची मुलगी जखमी झाली आहे. तसेच अन्य एक जण जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी सांगितली.

या अपघाताबाबत मिळालेली माहिती अशी की, डांबराने भरलेली पिंप घेवून एक कंटेनर छत्रपती संभाजीनगरकडे जात होता. इमामपूर घाटात उतारावा कंटेनर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले व तो एका टाटा इंट्रा या माल वाहतूक करणाऱ्या वाहनाला धडकला. त्यामुळे टाटा इंट्रा वाहन रस्त्याच्या कडेला पलटी झाले तर कंटेनरही रस्त्यातच उलटून आडवा झाला. त्याच वेळी नेवासा तालुक्यातील खरवंडी येथून मुलीच्या महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेसाठी नगरकडे मोटारसायकल वर येत असलेले अनिल दगडू फाटके यांच्या मोटारसायकलला कंटेनरची धडक बसली.

त्यामुळे ते गंभीर जखमी होवून मयत झाले. तर मोटारसायकल वर पाठीमागे बसलेली त्यांची मुलगी गंभीर जखमी झाली. या अपघाताची माहिती समजताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस पथक अपघातस्थळी पोहोचले. तातडीने रुग्णवाहिकेला पाचारण करुन जखमी मुलीला आणि तिच्या वडिलांना उपचारार्थ दवाखान्यात नेण्यात आलं. या अपघाता दरम्यान इमामपूर घाटात वाहनांची मोठी गर्दी झाली होती. कंटेनर रस्त्यावरच आडवा झालेला असल्याने आणि त्यात डांबराने भरलेले पिंप असल्याने ते रस्त्याच्या बाजूला काढण्याचे काम बराच वेळ सुरु होते. त्यामुळे या महामार्गावील वाहतूक बराच काळ ठप्प झाली होती. फाटके यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सेन्सेक्सची ७७,२३५.३१ वर ओपनिंग तर निफ्टी प्रथमच २३,५७०.८० अंकांच्या पार

आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजाराचा ऐतिहासिक उच्चांक

मुंबई – मोठ्या विकेंडनंतर सुरुवातीलाच शेअर बाजारात ऐतिहासिक घडामोडे पाहायला मिळाली आहे. सलग बाजार बंद राहिल्यानंतर मंगळवारी (दि.१८) स्टॉक मार्केटने उंच भरारी घेतली आणि विक्रमी सलामी दिली. सेन्सेक्सने बाजाराच्या सुरुवातीच्या सत्रात सर्वकालीन उच्चांकावर मजल मारली ७७,२३५.३१ अंकावर ओपनिंग केली तर दुसरीकडे नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा एनएसई निफ्टीही प्रथमच २३,५७०.८० अंकांच्या पार पोहोचला. विशेष म्हणजे अर्थसंकल्पपूर्वी पुन्हा एकदा सेन्सेक्सने ७७,००० अंकांचा आकडा पार करून एक नवीन शिखर सर केले आहे.

बाजारच्या सुरुवातीला बीएसई सेन्सेक्स २४२.५४ अंक म्हणजे ०.३४ टक्के वाढीसह ७७,२३५.३१ अंकावर ओपन झाला तर सेन्सेक्सप्रमाणे एनएसई निफ्टीनेही रॉकेटच्या वेगाने धाव घेतली आणि मार्केटच्या सुरुवातीला १०५.२० अंकांची उडी घेतून २३,५७०.८० अंकांवर सुरुवात केली. याआधी शुक्रवारी एनएसई निर्देशांक २३,४६५ अंकांवर बंद झाला होता.

कोणते शेअर्स तेजीत, कोणाला तोटा

सुरुवातीच्या व्यवहारात अदानी एंटरप्रायझेस, क्विस बँक आणि विप्रोचे शेअर्सनी सर्वाधिक उडी घेतली तर बीपीसीएल आणि ओएनजीसी या तेल विपणन कंपन्यांच्या समभागांच्या किमती १ टक्के हून अधिक तेजी नोंदवली गेली. दुसरीकडे ऊर्जा (एनर्जी), आयटी आणि एफएमसीजी, इन्फ्रा क्षेत्रात खरेदी होत असताना तर ऑटो क्षेत्रात तुलनेने कमी खरेदी दिसत आहे मात्र, हिरो मोटो कॉर्प या ऑटो सेक्टरमधील स्टॉकमध्ये खरेदीचा उत्साह दिसून येत असून बँकिंग क्षेत्रात कमजोरीचा कल दिसत आहे.

मार्केट कॅपिटल उसळले

दरम्यान, बाजारातील तेजीमुळे बीएसईचे बाजार भांडवल सतत नव्या उच्चांकावर पोहोचले आणि ४७७.२२ लाख कोटी रुपये किंवा १.२३ ट्रिलियन डॉलर्स झाले आहे. सध्या बीएसईमध्ये ३,४१९ शेअर्सची खरेदी–विक्री होत असून त्यापैकी २,१०६ शेअर्समध्ये तेजीत तर १,१९८ शेअर्समध्ये घसरण होत असून १४५ शेअर्स कोणताही बदल न होता व्यवहार करत आहेत. याशिवाय, मंगळवारी भारतीय शेअर बाजारातील मिडकॅप निर्देशांकानेही विक्रमी उच्चांक गाठला आणि प्रथमच ५५,४०० अंकांवर पोहोचला.

महाराष्ट्रातील सर्वात खरत कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
सर्व शालेय विद्यार्थ्यांचे आणि लेडीजचे रेनकोट मिळतील.
झील आणि वर्षा रेनकोट वर 20% डिस्काउंट
लेडीज कुर्ती पँट सेट सरसकट 20% डिस्काउंट
फॅन्सी क्रेप साडी 999/- रु. मधे 5 साड्या
भारी किंग साईझ बेडशीट वर 15% डिस्काउंट.*
वेगळ्या ठिकाणी आले तरच वेगळेपण पाहायला मिळेल..
अधिक माहितीसाठी भेट द्या.. श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

नगरमध्ये पहाटे व्यावसायिकाचे घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रकमेची चोरी

नगर – पहाटेच्या वेळी व्यावसायिक व त्याचे कुटुंब घरात झोपलेले असताना चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे लॉक तोडून आत प्रवेश करत घरातील कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख ४१ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना स्टेशन रोडवर शिवनेरी चौकात सोमवारी (दि.१७) पहाटे ५.१५ ते ६ या कालावधीत घडली.

याबाबत अशोक शिवाजी रोकडे (रा. स्वामी समर्थ मंदिरराजवळ, मार्कंडेय मार्ग, शिवनेरी चौक, रेल्वे स्टेशन रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी रोकडे यांचा केटरिंग चा व्यवसाय आहे. ते सोमवारी पहाटेच्या सुमारास कुटुंबासमवेत घरात झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाजाचे लॉक कशाच्या तरी सहाय्याने तोडले. घरात प्रवेश करत घरातील कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख ४१ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

रोकडे हे झोपेतून उठल्यावर त्यांना घरात चोरी झाल्याचे समजले. ही माहिती त्यांनी कोतवाली पोलिसांना कळविली. सदर माहिती मिळाल्यावर कोतवालीचे पो.नि. प्रताप दरोडे, उपनिरीक्षक के.एस कपिले यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली. शहर विभागाचे पोलिस उप अधिक्षक अमोल भारती यांनी ही घटनास्थळी भेट दिली. याबाबत रोकडे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात भा.दं.वि.कलम ३८०, ४५४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

EARTHS Green Library
Greenery for Every Space
Get a Plant Today!
• Potted Planters
• Premium Planters
• Garden Accessories
• Garden Furniture
• Garden Lightings
Fresh Environment with Indoor Plants
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा व सबस्टेशन उभारणी करण्याची मागणी करणारे निवेदन एम.आय.डी.सी.चे विद्युत महावितरणचे सहाय्यक अभियंता श्री. पाटील यांना देताना आमीचे जयद्रथ खाकाळ, महेश इंदानी, सुमित लोढा, पुरुषोत्तम नावंदर आदी.

खंडित वीजपुरवठ्याने उद्योजक त्रस्त, लपंडावामुळे बसतोयं 'आर्थिक फटका'

सबस्टेशन उभारण्याची आमी संघटनेची मागणी

नगर – शहरातील एमआयडीसीमध्ये वीजे अभावी उद्योजकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सबस्टेशन उभारण्याची मागणी आमी संघटनेच्या वतीने करण्यात आली. उद्योजकांच्या शिष्टमंडळाने विद्युत महावितरणचे सहाय्यक अभियंता पाटील यांच्यासह वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठा व इतर समस्यांबाबत चर्चा करून निवेदन दिले.

यावेळी अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, उपाध्यक्ष महेश इंदानी, सुमित लोढा, पुरुषोत्तम नावंदर, राजेंद्र शुक्ल, रोहन गांधी, सचिन पाठक, चाबुकस्वार, सुबोध खिस्ती, प्रवीण जुंदरे, सुमित सोनवणे, झरेकर, सतीश गवळी, शैलेश दिवटे आदी उपस्थित होते.

शहरातील एमआयडीसीमध्ये मागील सहा ते सात महिन्यांपासून सातत्याने दिवसागणिक वीज पुरवठा खंडित होत असून, उद्योजकांचे मोठे नुकसान होत आहे. वीजेच्या लपंडावामुळे सुरुळीत चालू असलेले उद्योग देखील बंद पडण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यात प्रामुख्याने जी, एफ, ए व एल ब्लॉक मध्ये प्रत्येक दिवशी वीज पुरवठा खंडित होत असल्याने उद्योजकांचे नुकसान होत आहे. तर इतर ब्लॉक मध्ये सुद्धा वीज पुरवठा खंडित होत आहे. एमआयडीसी मध्ये विजेची वाढती मागणी लक्षात घेता नवीन सबस्टेशन उभारण्याची गरज असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्युत महावितरणचे सहाय्यक अभियंता श्री. पाटील यांनी एमआयडीसीतील वारंवार खंडित होणारा विजपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न केला जाणार असून, कुठेही वीज संदर्भात त्रुटी आढळल्यास व काही अडचण निर्माण झाल्यास तातडीने कळविण्याचे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधायुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी
मोफत सर्व रोग तपासणी शिबीर
दि. १० जुन ते २० जुन २०२४ रोजी सकाळी १० ते १ वा. व दुपारी ३ ते ६ वा. (रविवार सोडून)
रक्त डॉक्टर
डॉ. दिलीप जोधळे MBBS, MD, M.R.C.P.I. (Ireland) एम. पॅथॉलॉजी
डॉ. अनिल जाधव MBBS, MD एम. पॅथॉलॉजी
डॉ मिलिंद कोरडे MD DM(CL), DNB (MED), DNB (CARDIOLOGY) हृदयरोग तज्ञ
डॉ. प्रदीप कंठाळी MBBS DNB (Gen. Medicine), DNB (Cardiology) कन्सल्टंट फिजिशियन, मधुमेह तज्ञ
डॉ. पंकजीन गायकवाड अस्थिरोग तज्ञ
डॉ. संदिप सुरसे MBBS, MS (General Surgery) जनरल सर्जरी
डॉ. प्रतीभा पवार–पन्हार MBBS, MS (Obs & Gyn) सीनीयर व स्त्रुती रोग तज्ञ
डॉ. चेतिका शेरकर MBBS, MS (Obs & Gyn) सीनीयर व स्त्रुती रोग तज्ञ
डॉ. सागर शिरसाठ पाटील MBBS, DGO, DNB, FMRS, DRM, MRAMS सीनीयर, स्त्रुती रोग व वंध्यत्व निवारण तज्ञ
डॉ. गणेश मिसाळ MBBS DCH, IPPC PGPN Paediatrician & Neonatologist बालरोग तज्ञ
डॉ. मिलन काळे (कोरडे) MBBS, DCH बालरोग तज्ञ व नवजात शिशु तज्ञ
डॉ. जयश्री गायकवाड MBBS, DCWS नैसर्गिक रोग तज्ञ
डॉ. प्रसन्न शाळुकार MBBS, MD (Medicine) DM Neptro. किडनी विकार तज्ञ
डॉ. आकाश वेरुळ MBBS, MD (Medicine) Fellowship in Nephro. किडनी विकार तज्ञ
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध
मोफत सल्ला तपासणी
२४ तास अत्यावश्यक व अँबुलन्स सुविधा उपलब्ध
ओपिनिअनी तज्ञ भलतानाम १०% पर्यंत सवलत
सोनोग्राफी, एक्स–रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंध्यत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
शिबीरस्थळ
इंडो आयरिश हॉस्पिटल
लक्षीकर रोड, सावेडी, अहमदनगर. फोन : 0241-2423336, मो. 9130423336.
सौजन्य : Union Bank
मोफत तपासणी
Scan For Direction

Sundaram classmate YOUVA
या कंपनीच्या १२ वह्यांवर ४ वह्या मोफत..
Friendly's
कंपनीच्या १२ वह्यांवर ७ वह्या मोफत..
आर.एन.आर्ट अँण्ड क्राफ्ट
गिफ्ट अँण्ड स्कूल स्टेशनरी । होलसेल अँण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझ्ड गिफ्ट अँण्ड टॉईज
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्मिंद म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

युवा मित्रांनो, उद्दिष्ट ठरवा, करिअर घडवा...

१० वी, १२ वी, पदवी, इतर काही परीक्षांचे निकाल जाहीर झाले. विद्यार्थ्यांचे करिअरबद्दलची ध्येयधोरणे, निर्णय, धावपळ जोरात असतील. सर्वांना स्वप्न असतील.

करिअरबाबतची अनेकांची विविध स्वप्नं असतील. त्यासाठी प्रत्येकजण प्रयत्नांची पराकाष्ठा करत असतो. निरंतर कष्ट करण्याची तयारी व एकाग्रता असेल तर तरवलेले उद्दिष्ट गाठणे खूप अवघड नाही.

शिक्षण व विशिष्ट कोर्ससनंतर नोकरी मिळवणे, व्यवसाय निर्मिती इ. आजच्या काळात कठीण आहे. कारण प्रचंड लोकसंख्या, तीव्र गळेकापू स्पर्धा अन् मर्यादित उपलब्धता.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

आजच्या काळात, स्पर्धात्मक युगात वेगवान, अचूक, कौशल्याने काम करणाऱ्या मंडळींना मोठी मागणी व वाव आहे. असांतानच नोकरी, स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी आहेत.

म्हणूनच करिअर ठरवतांना, करतांना पुढील गोष्टी मनात नोंदवल्याच पाहिजेत - सर्वात प्रथम कौशल्यवान व्हा. सामाजिक व इतर संपर्क वाढवा. स्वतःशी व सामाजी प्रामाणिक रहा, तंत्रज्ञानाच्या या युगात तांत्रिक कौशल्याला पर्याय नाही. सौजन्यपूर्ण हरहुन्नरी व्यक्तिमत्व बनवा. मग पहा हव्हूहळू करिअरसह जीवनाच्या वाटेवरही तुम्ही प्रगतीपथावर असाल.

वसंत राठोड यांची भाजप मधून हकालपट्टी करावी; भिंगार भाजप कार्यकारणीच्या बैठकीत ठराव संमत

नगर – लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाच्या शहर जिल्हाध्यक्षांवर प्रसार माध्यमांमधून चुकीचे आरोप करत पक्षाची जनसामान्यांत प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी आणि पक्ष शिस्तीचा भंग केल्या प्रकरणी भिंगार शहरातील छावनी परिषद नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड यांची पक्षातून हकालपट्टी करावी असा ठराव भिंगार भाजप कार्यकारणीच्या बैठकीत संमत करण्यात आल्याची माहिती भाजपाचे भिंगार मंडल अध्यक्ष शाम बोळे यांनी दिली आहे.

याबाबत त्यांनी म्हंटले आहे की, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भिंगार शहरात महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांना जवळपास २ हजार मतांचे लीड महायुतीच्या कार्यकर्त्यांचा माध्यमातून मिळाले आहे. परंतु भिंगार शहरातील छावनी परिषद नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड यांनी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांच्यावर अत्यंत चुकीचे आरोप केले. वसंत राठोड यांच्याकडे पक्षाचे कुठलीही जबाबदारी नाही, पद नाही, तरी सुद्धा त्यांनी प्रसिद्धी मिळविण्यासाठी पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नुकतीच भिंगार भाजप कार्यकारणीची तातडीची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. तसेच वसंत राठोड यांची भिंगार भाजप पक्षातुन बडतर्फ (हकालपट्टी) करण्यात यावी असा ठराव संमत केला. सदर ठराव हा पक्षाचे जिल्हा अध्यक्ष, जिल्हा प्रभारी, प्रदेश अध्यक्ष यांना त्वरित मेल द्वारे पाठविण्यात आला आहे.

भिंगारमध्ये भिंगार भाजप मध्ये काम करत असतांना कायम पक्षाच्या अधिकृतपणे निवड झालेल्या अध्यक्ष पदाधिकारी यांच्या कामात अडथळा करणे, विरोध करणे, फोटो सेशन करून पक्षाला खूप काम करत आहे असे भासवने, पक्षाची फसवणुक करणे, कायम खोटे आश्वासन देणे, जनतेची फिरवणूक करणे, धुळफेक करणे, जनतेला छावणी परिषद कामासाठी चकरा मारण्यास लावणे असे उद्योग ते करत असतात. त्यामुळे पक्षाची प्रतिमा मलीन होत आहे. त्यामुळे त्यांची त्वरित हकालपट्टी करण्याची मागणी वावेळी करण्यात आली.

या बैठकीस भाजप मंडल अध्यक्ष शाम बोळे, मंडल सरचिटणीस आपासाहेब हंचे, बाळासाहेब घाकतोडे, प्रकाश लुनिया, प्रकाश रासकर, रवी बाकलीवाल, संतोष हजारे, दामू माखीजा, चेतन वजगडकर, राजू दहीहंडे, रुपेश फले, राजेंद्र फुलारे, मार्गव फुलारे, प्रदीप नामदे, संचिन फिरोदिया, बाळकृष्ण थंबारे, संजय पांढरे, सचिन वाघमारे, मयूर जोशी, निलेश साठे, अनिरुद्ध देशमुख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

मेहेरनझरमधील अवतार मेहेरबाबा यांचा १९ जूनला सायंकाळी लघुचित्रपट दाखविणार

नगर – येथील अवतार मेहेरबाबा अहमदनगर केंद्र, सरोष पेट्रोल पंपाजवळ, झेंडिगेट येथे १९ जून रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत सर्व ईश्वरप्रेमींना अवतार मेहेरबाबांच्या जीवनावर आधारीत विविध लघु चित्रपट दाखविण्यात येणार आहे.

डेहराडुनमध्ये मेहेरबाबा : डेहराडुनला मेहेरबाबांनी वृंदावन म्हटलेले आहे. हा सुंदर चित्रपट १९४० मध्ये त्यांनी केलेल्या कामाचा आणि नवजीवन १९५० आणि १९५३ मध्ये तेथे दिर्घकाळ राहिलेल्या कामाचा लेखाजोखा आहे. रॉबर्ट ब्रेडरिक्स यांचा चित्रपट.

मेहेरबाबा युगावतार : सुरुवातीस तो कोण आहे हे फार थोड्याच लोकांना माहित होते. परंतु शेवटी संपूर्ण विश्वाला कळले की जगात कल्पनेपलिकडे कही घडते आहे. भारतात सन १९५० ते १९६५ या १५ वर्षांच्या कालावधीत घडलेल्या या मंत्रमुग्ध करणाऱ्या चित्रपटात तुम्हांस जे काही दिसेल, तुम्ही मेहेरबाबांसोबत प्रवास करताल आणि देवाच्या नशेत असलेल्या आत्म्यांसह त्यांच्या कार्याचे साक्षीदार व्हाल.

या चित्रपटात सन १९८८ मध्ये सॅन फ्रॅन्सिस्को, लॉस एंजलिस आणि लंडन येथे प्रिमियर केलेले आणि शिकागो इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल १९८९ मध्ये सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंटरी म्हणून नामांकित करण्यात आलेली दुर्मिळ दृश्ये अनेक वर्षांच्या परिश्रमाने पुनर्रसंचित करण्यात आलेली आहेत. चित्रपटातील संपुर्ण कथन मेहेरबाबांच्या थेट अवतारणातून आहे आणि त्यांच्या दैवी अधिकाराचे संपुर्ण वजन आहे. निर्मिती आणि दिग्दर्शन आयर्विन लंक यांनी केले आहे.

जुन १९७१ मधील मेहेराबाद येथील पाद्री, सिध्द आणि मोहंमद मस्त : मेहेरबाबांचे शिष्य पाद्री, सरोष आणि सिध्द आणि मेहेराबादमध्ये अनेक वर्ष वास्तव्य करणारे त्यांचे खास मस्त मोहंमद यांची अप्रतिम मुलाखत. आयर्विन आणि एडवर्ड लंक यांचा चित्रपट, जो सन २००९ मध्ये हाय डेफिनेशनमध्ये रिमास्टर केलेला होय.

रिक्षासह चालक संघटनेचा २० जूनला जिल्हाधिकारी कार्यालयावर 'मोर्चा'

दररोज पन्नास रुपये दंड आकारणीचा निर्णय रद्द करण्याची मागणी

नगर – परवाना धारक ऑटो रिक्षाना फिटनेस लेट साठी केंद्र सरकार परिवहन विभागाने ५० रुपये रोज दंड आकारणी सुरु केली आहे. तो निर्णय केंद्र सरकारने मागे घ्यावा यासाठी २० जून रोजी ऑटो रिक्षा सह जिल्हाधिकारी कार्यलयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी दिली.

याबाबत त्यांनी म्हटले आहे की, केंद्रीय परिवहन याबाबत त्यात म्हटले आहे का विभागाने ऑटो रिक्षा फिटनेस लेट साठी रोजी ५० रुपये रोज दंड आकारणी सुरु केलेली आहे. ती मागे घ्यावी तसेच महाराष्ट्रातील रिक्षा चालकांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करून कामकाज चालू करावे. ऑटो रिक्षाचे चालू असलेले परवाने तात्काळ बंद करावे. परवाना धारक ऑटो रिक्षासाठी आर.टी.ओ.मध्ये स्वतंत्र व्यवस्था करावी. त्यांना आर. टी. ओ. अधिकारी कर्मचाऱ्याने पार्सिंग व इतर कामासाठी मदत करावी. अशिक्षित रिक्षा चालकांची आर्थिक लुट थांबवावी व इतर मागण्यांसाठी २० जून रोजी सकाळी ११.०० वाजता रिक्षासह विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चा माळीवाडा बस स्थानका जवळील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पासून माळीवाडा पंचपीर चावडी, माणिक चौक, कापड बाजार, तेलीखुंट, चितळे रोड, न्यू. आर्टस् कॉलेज, सरकारी दवाखाना, तारकपूर ते डीएसपी चौक पासून जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत निघणार आहे. याची शासनाने नोंद घ्यावी, असे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, कार्याध्यक्ष विलास कराळे, सरचिटणीस अशोक औशिकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

न्यू आर्टस् कॉलेज संगणक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी २२ जूनला सामायिक प्रवेश पूर्व परीक्षा

प्र.प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे

नगर – नवीन शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. न्यू आर्टस् मध्ये संगणक क्षेत्राशी निगडित बी.एस्सी. डेटा सायन्स, क्लाऊड कॉम्प्युटिंग, कॉम्प्युटर सायन्स, या तीन पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी २२ जून रोजी ऑनलाईन प्रवेश परीक्षा होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी दिली.

न्यू आर्टस् कॉलेजमध्ये नव्याने सुरू झालेल्या बी.एस्सी. (क्लाऊड कॉम्प्युटिंग) अभ्यासक्रमाविषयी अधिक माहिती देताना प्र. प्राचार्य डॉ. सागडे म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांमध्ये विज्ञानशाखे अंतर्गत क्लाऊड कॉम्प्युटिंग हा अभ्यासक्रम फक्त न्यू आर्टस् कॉलेज मध्येच उपलब्ध आहे. बी.एस्सी. (डेटा सायन्स) अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये वेगाने होणाऱ्या तांत्रिक प्रगतीची दखल घेऊन न्यू आर्टस् महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी कालसुसंगत अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यामध्ये अग्रेसर आहे.

न्यू आर्टस्च्या संगणक शिक्षणाशी संबंधित या तीन पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश पूर्व परीक्षा देणे आवश्यक आहे. प्रवेश पूर्व परीक्षेचे अर्ज महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून प्रवेशासाठी २० जून पूर्वी अर्ज करणे आवश्यक आहे.

इच्छुक पालक आणि विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या संगणक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्र. प्राचार्य डॉ. सागडे यांनी केले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी सेंटर फॉर अँडव्हान्स स्टडीज इन अप्लाईड सायन्सेस (CASAS) शी संपर्क साधावा.

घरासमोरून मोटारसायकलची चोरी

नगर – अपार्टमेंटच्या समोरील जागेत लावलेली होंडा कंपनीची युनिकोर्न मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी पी ९२९०) अज्ञात चोरट्याने रात्रीच्या वेळी चोरून नेल्याची घटना पटेल मंगल कार्यालयासमोरील कॅपिटल वन अपार्टमेंट येथे घडली.

याबाबत डॉ. बाबासाहेब ठकाजी कडूस यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर चोरीची घटना ही सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून फिर्यादी डॉ.कडूस यांनी सदर सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना दिले आहे.

मुलींच्या मोफत उच्च शिक्षण घोषणेची राज्यात अंमलबजावणी करण्यात यावी

मनसेचे नगर शहर सचिव डॉ.संतोष साळवे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



नगर – राज्य शासनाने मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याच्या घोषणाची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नगर शहर सचिव डॉ.संतोष साळवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मुलींना बारावीनंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी मोफत शिक्षण देण्याची घोषणा राज्य सरकारतर्फे राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ९ फेब्रुवारी २०२४ रोजी जळगावमध्ये केली होती. आता शैक्षणिक वर्षाचे प्रवेश चालू झाले आहेत. तेव्हा उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत प्रवेश मिळणार का? याचे उत्तर संस्था चालकांकडे नाही. ते प्रवेश घेणाऱ्या मुलींना सांगतात की, तशा प्रकारचा शासन आदेश आमच्याकडे आलेला नाही. मुलींना मोफत शिक्षण देण्याचा आदेश आल्यास त्याची त्वरित अंमलबजावणी केली जाईल. तेव्हा राज्य सरकारने मुलींना मोफत शिक्षण देणारा आदेश त्वरित निर्गमित करावा. म्हणजे घोषणेप्रमाणे ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखापेक्षा कमी आहे अशा मुलींना मोफत शिक्षणाचा लाभ घेता येणार आहे. तसेच त्यांना अधिवास दाखला व उत्पन्नाचा दाखला काढता येईल. जर शासकीय आदेशच नसतील, तर दाखले काढून काय फायदा असाही प्रश्न मुलींच्या मनात निर्माण होत आहे. तेव्हा मुलींना मोफत शिक्षणाची घोषणा जरी झाली तरी त्यांना शासन निर्णयाची वाट पाहावी लागत आहे. तरच मोफत शिक्षणाचा लाभ मुलींना चालू शैक्षणिक वर्षापासून मिळणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने त्वरित पावले उचलणे गरजेचे आहे.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तेव्हा मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी या घोषणेची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. ही सवलत बारावीनंतरच्या अभ्यासक्रमांसाठी आहे. तेव्हा घोषणा जरी झाली तरी शासन निर्णय निर्गमित होणे गरजेचे आहे. तरच खऱ्या अर्थाने आपल्या राज्यातील मुली मोफत उच्च शिक्षण घेऊ शकतील.

महत्त्वाची बाब म्हणजे, बारावीनंतरच्या अभ्यासक्रमांचा विचार करता, यामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान पदवी तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षण, कायदा, बी. एड, फार्मसी, शेती, व्यवस्थापकीय कोर्सेस व इतर खासगी प्रोफेशनल कोर्सेस इत्यादींचा समावेश आहे. याचा अर्थ बारावीनंतर जवळजवळ ८०० विविध अभ्यासक्रमांमध्ये मुलींसाठी ही सवलत असणार आहे. यात काही विना अनुदानित अभ्यासक्रम आहेत. बऱ्याचवेळा ग्रामीण भागातील मुलींची उच्च शिक्षण घेण्याची खूप इच्छा असते. मात्र आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना इच्छा असून सुद्धा शिक्षण घेता येत नाही.

तेव्हा या घोषणेने त्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. तेव्हा महाराष्ट्र शासनाने मुलींसाठी मोफत उच्च शिक्षणाची घोषणा केली आहे त्याचा शासन निर्णय त्वरित निर्गमित करावा. जेणेकरून या योजनेचा लाभ राज्यातील मुली घेऊन मुलींचे उच्च शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ होईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

केडगावमध्ये १६ वर्षीय युवतीची आत्महत्या

नगर – केडगाव उपनगरातील शाहू नगर भागात ५ गोडावून जवळ एका १६ वर्षीय युवतीने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना सोमवारी (दि.१७) रात्री घडली. तिने रात्री ८ च्या सुमारास गळफास घेतल्याचे तिच्या कुटुंबियांच्या निदर्शनास आले. त्यामुळे तिला बेशुद्धावस्थेत ताताडीने उपचारासाठी रात्री ८.३० च्या सुमारास जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.खेडकर यांनी तिला उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

याबाबतची माहिती दवाखाना ड्युटीवर असलेले तोफखाना पोलिस स्टेशनचे पो.हे.कॉ. जी जी बोरुडे यांनी कोतवाली पोलिसांना कळविली. पोलिसांनी या माहिती वरून आकस्मात मृत्यूची नोंद केली असून तिचे आत्महत्या का केली असावी, या कारणांचा पोलिस शोध घेत आहेत.

एकनाथ भिंगारदिवे यांचे दु:खद निधन

नगर – बोल्हेगाव गावठाण येथे राहणारे एकनाथ सोनाजी भिंगारदिवे (वय ६८) यांचे १८ जून रोजी निधन झाले. त्यांच्यावर बोल्हेगाव येथील सीना नदी तिरावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, २ बहिणी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

प्रमिलाबाई बेल्हेकर यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – येथील नालेगाव, तांगेगल्लीत राहणाऱ्या श्रीमती प्रमिलाबाई अशोकराव बेल्हेकर (वय ७३) यांचे ५७ जून रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्या माजी महापौर भगवान फुलसौंदर व विष्णू फुलसौंदर यांच्या मावशी तसेच कै. किशोर बेल्हेकर, कै. नितीन बेल्हेकर यांच्या मातोश्री व वसंतराव बेल्हेकर यांच्या भाऊजय होत. त्यांच्या मागे २ सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

राजयोग जीवनपध्दती निरोगी जीवनासाठी एक वरदान आहे

सुवालाल शिंगवी यांचे प्रतिपादन

नगर – राजयोगा जीवनपध्दती निरोगी जीवनासाठी एक वरदान आहे. सर्वांनी याचा अभ्यास करून आपले जीवन निरोगी-आनंदी व शांतपूर्ण बनविले पाहिजे. संयोजकांनी अशा प्रकाराचा सप्ताह आयोजित करून जनमाणसामधे शांतीची, आनंदाची पेरणी केली जात आहे. मी संयोजकांचे आभार मानतो, असे ब्रह्माकुमारीज परिवारातील सुवालाल शिंगवी यांनी भावना व्यक्त केल्या.

येथील रोटरी क्लब ऑफ अहमदनगर संचलित रोटरी पीस सेंटर व ब्रह्माकुमारीज्चे साईबन में मधुबन गीतापाठशालाद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग-आनंद-शांती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन १५ ते २१ जून च्या दरम्यान विविध ठिकाणी राजयोग शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ 'अनामप्रेम' या संस्थेत सुवालाल शिंगवी यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आला. या प्रसंगी रोटरी परिवारातील समन्वयक नितिन थाडे, मार्गदर्शक व राजयोगाच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया, अनामप्रेमचे अजील माने, पत्रकार भुषण देशमुख, डॉ. प्रकाश कांकरिया, रोटरीचे सचिव दिपक गुजराथी, निलेश वैकर, पुरुषोत्तम जाधव, रविंद्र राऊत हे उपस्थित होते, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष माधवराव देशमुख यांनी दिली.

सुरुवातीला प्रतिमा पुजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. नितिने थाडे यांनी सप्ताहाची माहिती सांगुन स्वागत केले. राजयोगाच्या अभ्यासक व या सप्ताहाच्या प्रोजेक्ट चेअरमन डॉ. सुधा कांकरिया यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाची माहिती सांगुन अनामप्रेम संस्थेतील सर्व अंध-अपंग बांधवाशी प्रेमळ संवाद साधला व त्यांच्याकडून राजयोगा मेडिटेशनचा अभ्यास करुन घेतला व ३ महिन्यापासुन वर्षभरासाठी येथील विद्यार्थ्यांसाठी राजयोगाचे कोर्सेस चालू आहेत.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर संचलित रोटरी पीस सेंटर व ब्रह्माकुमारीज्चे साईबन में मधुबन गीतापाठशालाद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राजयोग शिबीराचा शुभारंभ सुवालाल शिंगवी यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आला. या प्रसंगी रोटरी परिवारातील समन्वयक नितिन थाडे, डॉ. सुधा कांकरिया, अजील माने, पत्रकार भुषण देशमुख, डॉ. प्रकाश कांकरिया, दिपक गुजराथी, निलेश वैकर, पुरुषोत्तम जाधव, रविंद्र राऊत आदी.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'योग-आनंद-शांती' सप्ताहाचे उद्घाटन

भुषण देशमुख म्हणाले की मी स्वत: राजयोग मेडिटेशनचा कोर्स केला आहे व नुकतेच मला माऊंट अबू येथील मुख्यालयामध्येही योग अभ्यास करण्याची सुवर्णसंधी मिळाली. मला त्याबद्दल समाधान वाटते. आपणही सर्वांनी राजयोगा जीवनपध्दतीचा अवलंब करावा.

अनामप्रेम मधील राजयोगाचा नियमित अभ्यास करणारी विद्यार्थिनीने राजयोगाबद्दल आपला अनुभव सांगितला. ती म्हणाली की मी नियमित राजयोगा मेडिटेशन करते त्यामुळे मी अंध असल्याची कमीपणाची भावना मला वाटत नाही उलट कुठल्याही परिस्थितीवर मात करण्याची उभारी मला मिळाली आहे. माझे मन प्रसन्न व एकाग्र झाले आहे. त्यामुळे माझा शालेय अभ्यास उत्तम होतो या वेळेस मला मार्कस् चांगले मिळाले आहेत.

सौ. माने यांनी अनामप्रेम मधील विष्णू यांनी मुकबधीर विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या भाषेत कार्यक्रम समजावून सांगितला. १९ जून रोजी सकाळी ९.३० वा स्नेहालय इंग्लिश मिडियम स्कुल, २० जून रोजी सकाळी ७.३० वा रेसिडेन्शिअल हायस्कुल शेवगाव, २१ जून रोजी सकाळी ८ वा अहमदनगर कारागृह, सकाळी १० वा. विसापूर खुले कारागृह, आणि रात्री ८ वा. युटयुबर ऑनलाईन लाईव्ह वैश्विक शांतीसाठी संघटित मेडिटेशन अशा सप्ताहाचे आयोजन केले आहे असे सचिव दिपक गुजराथी यांनी सांगून आभार मानले.

गृहिणी

आरोग्य

थंडीत बाळाचे कपडे

बऱ्याच वेळा बाळाला थंडी वाजेल म्हणून स्त्रिया त्याला जाड कपडे घालतात, मात्र या कपड्यांमुळेही त्यांना त्रास होऊ शकतो. त्यांच्या अंगावर हिट रॅशेस येऊ शकतात. त्यामुळे बाळाला जाड कपडे घालण्याऐवजी लोकरीचे किंवा उबदार कपडे घालावेत. त्यामुळे त्यांच्या त्वचेला कोणतीही इजा पोहोचत नाही.

पाककला

पावाच्या वड्या

साहित्य – पाव तीन तुकडे, खवा पाव कप, पिठी साखर दोन टेबलस्पून, तूप तळण्यासाठी अर्धा कप, चार दाणे वेलदोडे.

कृती – पावाच्या कडा काढून त्याचे एकेक इंचाचे चौकोनी तुकडे करावेत. खवा परतून त्यात पिठीसाखर एकत्र करावी. पाव मंद विस्तवावर तेलात गुलाबी तळावे. त्या प्रत्येकावर साखर मिसळलेला खवा लावून त्याच्यावर मधोमध एकेक वेलदोडयाचा दाणा दाबून बसवावा. खवा नसल्यास साखर व खोबरे शिजवून त्याचा थर द्यावा किंवा तीळ भिजवून त्यात साखर घालून शिजवून ते सारण लावावे. पावाचे तुकडे निरनिराळ्या आकाराचे कापावेत. सारणातही वेगवेगळे इसेन्स घालावेत.

सौंदर्य

ऑईली त्वचेसाठी

* अशा त्वचेतील तेलग्रंथीतून बाहेर पडणाऱ्या तेलामुळे मुरमे व टॅनिंगचा धोका असतो. तो टाळण्यासाठी चंदन पावडरमध्ये थोडीशी तुळशीची पाने व गुलाबपाणी मिसळून चेहऱ्यावर लावावे व वाळल्यानंतर धुवावे. या मास्कने त्वचा तुकतुकीत होते व रोमछिद्रे बंद होतात.

* अर्धा चमचा मध आणि चार चमचे दही एकत्र करून पेस्ट तयार करावी. ही पेस्ट, चेहरा, हातापयांना चोळून लावावी व १५ मिनिटांनी स्नान करावे. त्वचा तजेलदार व उजळ होईल.

वास्तू

शुभप्रसंगीचे निमंत्रण वा बोलावणे दरवाजाच्या उंबरठ्यावर स्वीकारू नये वा कुणाला दरवाजात उभे राहू देऊ नये.

सल्ला

* ग्रेव्ही बनवताना त्यामध्ये एक चमचा बेसन टाकले तर ग्रेव्ही स्वादिष्ट व दाट बनते.

* मेणबत्ती पॉलिथीनमध्ये गुंडाळून ५-६ तास फ्रीजमध्ये ठेवा. त्यामुळे ती जास्त वेळ जळेल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

बुधवार, दि. १९ जून २०२४

प्रदोष, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, विशाखा १७।२३

सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

राशिभविष्य–

मेष : आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल. मागील उधारी वसुल होईल. आरोग्य उत्तम राहील. मानसिक सुख–शांतीचे वातावरण राहील.

वृषभ : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील. जिभेला सुखावणारा दिवस असेल. मित्र आनंद देतील. उल्हासाचा अनुभव येईल.

मिथुन : व्यस्त राहाल. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. आजचा दिवस आर्थिक कार्यासाठी चांगला आहे. शीघ्र अनुकूल परिस्थिती होईल. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा.

कर्क : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न करा. सुख–शांतीचे वातावरण राहील. आपल्या धाडसात वाढ होण्याची शक्यता आहे.

सिंह : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. प्रेमसंबंधांमध्ये आवश्यक प्रगती होईल.

कन्या : काळजीपूर्वक कार्य करा. नोकरीत असलेल्या व्यक्तीनी कार्यात सहकार्य घेऊन चालावे. आपल्या खाण्या–पिण्याच्या सवयींची काळजी घ्या. रोख रकमेची मोठी देवघेव टाळा.

तूळ : हातावर हात ठेवल्याने कोणतेही कार्य होत नाही. कोणत्याही कार्यात बेपर्वाईने वागू नका. आरोग्य उत्तम राहील. अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेली कामे पूर्ण होतील. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल.

वृश्चिक : शत्रू प्रभावहीन होतील. कार्यक्षेत्रात नवीन प्रोजेक्टची सुरूवात करण्यापूर्वी यथायोग्य विचार करा. वाहने सावकाश चालवावीत व सांभाळावीत चोरी होण्याची शक्यता आहे. अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळेल.

धनु : वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील. अकस्मात आलेल्या परिवर्तनांमुळे आपल्या जीवनाला नवीन दिशा मिळेल. नोकरीपेशा व्यक्तींना पाठबळ मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

मकर : आजच्या दिवसाचा उपयोग नाती–संबंधात नवीन उर्जा भरण्यासाठी करा. आरोप–प्रत्यारोपांपासून दूर रहा. काही लोकांचे चातुर्य आपल्या मनातील शांतता भंग करेल. विशिष्ट कार्य पूर्ण होतील.

कुंभ : मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. मित्रांचा सहयोग मिळेल. त्याची कसोटी घेणारा हा दिवस आहे. भविष्यात मान–सन्मानात वाढ होईल. कौटुंबिक प्रश्नांचे निराकरण होईल.

मीन : वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल. आपणास आकस्मिकरीत्या इतर लोकांबरोबर चांगला काळ व्यतीत होईल. आरोग्याच्या दृष्टीने उत्तम वेळ आहे. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९४८ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :– १) परंपरेने चालत आलेला ७) एक मांसाहारी खाद्यपदार्थ ८) गडबड गोंगाट ९) शेत; वन; जंगल १०) माणसाविषयी १२) देवाला भजण्याचा एक प्रकार १४) शेवट; अखेर १५) वाळ्याचे अत्तर १७) वांगे भाजून केलेले एक कालवण १९) घाई; त्वरा; तातडी; धांदल २१) वाटणी; वितरण २३) जीवन; पाणी; नीर २४) राख; रक्षण; राखी २५) ऐकण्याचे इंद्रिय; कर्ण

उभे शब्द :– १) अस्तव्यस्त पसरलेल्या वस्तू २) म्यानमारची राजधानी ३) नवरा; स्वामी; मालक ४) आकाशात उंच घेतलेली झेप ५) व्यवस्था; तरतूद ६) कारुड; सुरमा; कज्जल ११) गूढ; लपून राहिलेले १३) हाताच्या किंवा पायाच्या बोटाच्या शेंड्यावर येते ते कवच १४) पंजाबमधील एक प्रमुख नदी १६) समाप्ती; शेवट; सांगत १७) उपासाला चालणारा एक कंद १८) भाकरी, पोळी वगैरे ज्यावर भाजतात ते पात्र २०) मासे पकडण्याची आकडा लावलेली काठी २२) बांगला देशचे चलन

शब्दगंध क्र. ६९४७ चे उत्तर

म	हे	त		स	ब	रा	स
र	झा	प		ली	ला	ब	ली
दु		ल	भ				बे
का	रा	बी		ब	ला	ज	सा
ज			ब		ब	र	स
	ध	त	ल	ब		त	
अं	ग		सा		भा	र	त
बा	ज	र	ज	त		प	

* * * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : फुले म्हणजे पृथ्वीवर सुगंधाची उधळण करणारे व हृदयाला प्रकाशित करणारे तारे आहेत. – **लॉंगफेलो.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

वजन व उंचीचे प्रमाण नेमके किती असावे

व्यक्तीची वाढ किती व्हावी याच्या मर्यादा आहेत. आनुवंशिकता हे वजन व उंची जास्तीत जास्त किती वाढेल याचे कारण असले तरी कुपोषण, गंभीर रोग, जंतांची लागण, थायरॉईड ग्रंथीचा रोग आदी कारणांनी वाढीवर परिणाम होतात. त्यामुळे एखादी व्यक्ती अनुवंशिकतेमुळे खुजी आहे वा खूप लठ्ठ आहे असे म्हणण्यापूर्वी, इतर सर्व रोग नाहीत याची तपासण्यांनी खात्री करणे अत्यंत आवश्यक असते.

जन्माच्या वेळी बाळाचे वजन २.८ किलो असते. ते पहिल्या वाढदिवसाला तिप्पट म्हणजे ८.४ किलो, तर दुसऱ्या वाढदिवसाला ११.२ किलो इतके होते. त्यानंतर दर वर्षाला (१८ वर्षांपर्यंत) २ ते २.५ किलो वजन वाढते. त्यानंतर तुमचे वजन किती आहे हे पाहण्यासाठी एक सोपे समीकरण आहे. सें. मी. मधील तुमच्या उंचीतून १०० वजा केल्यास येणारी संख्या म्हणजे तुमचे कि. ग्रॅ. मधील वजन. अर्थात यापेक्षा १०% कमी वा जास्तही वजन चालू शकेल. जन्माच्या वेळी बाळाची लांबी ५० सें. मी. तर पहिल्या वाढदिवसाला ती ७५ सें. मी. इतकी असते. दुसऱ्या वाढदिवसाला ती ८७.५ सें. मी. आणि त्यानंतर दरवर्षी ५ ते ६ सें. मी. इतकी वाढते. जास्तीत जास्त वयाच्या २५ वर्षेपर्यंत उंची वाढू शकते. भारतात पुरुषांची सरासरी उंची साडेपाच फूट, तर स्त्रियांची उंची ५ फूट असते. पुरुषाचे सरासरी वजन ६० किलो, तर स्त्रियांचे सरासरी वजन ५० किलो असते. कोणत्या वयासाठी किती वजन व उंची असावी, याचे तक्ते उपलब्ध असतात. तक्त्यावरूनही उंची व वजन काढता येते.

लपलेले हरीण

एका हरणामागे पारध्याची कुत्री लागली असता जीव वाचवण्यासाठी ते हरिण धावत–धावत शेतातील गुरांच्या गोठ्यात शिरले आणि एका गवताच्या गंजीत लपून बसले. ते पाहून गोठ्यातला बैल हरणाला म्हणाला,

''अरे मित्रा, जीव वाचविण्यासाठी जेथे तू लपला आहेस, तेथेच तुझा जीव मात्र लवकर जाईल.''

तेव्हा हरिण म्हणाले, ''मित्रांनो, तुम्ही जर मला गप्प बसून सहकार्य केले, तर मला येथे फारशी भीती नाही. संकट दूर होताच मी येथून पळून जाईन.''

अशा प्रकारे रात्र होईपर्यंत ते हरिण गंजीतच लपून बसले. रात्र पडू लागताच गुराखी पेंढ्या घेऊन आला आणि बैलांना खायला देऊन गेला. त्याला ते हरिण दिसले नाही. थोड्या वेळातच मालकाची मोठी मुले तेथे येऊन गेली. त्यांनाही हरिण दिसले नाही.

आपल्याला कोणी पाहिले नाही याचा आनंद होऊन हरिण बैलाला म्हणाले, ''बैलदादा, तुमच्या कृपेमुळेच आज मी वाचलो. तुमचे माझ्यावर फार उपकार झालेत.

तेव्हा मालक म्हणाला, ''अरे, या लवकर, धावा धावा.'' मालकाचे ओरडणे ऐकून त्याचे नोकर हातात लाठ्या काठ्या घेऊन तेथे धावले, आणि गंजीआड लपलेले हरिण त्यांनी त्याला काठ्यांनी झोडपून ठार केले.

तात्पर्य : जे ठिकाण सुरक्षित नाही, अशा ठिकाणी एक–दोनदा जिवावरचे संकट टळले, तरी तेथे कायमच सुरक्षितता लाभेल, असे समजू नये.

जीवन चक्र

काहीही घडत असले तरी शांत राहण्याने क्रोधावर विजय मिळवता येतो. कार्यालयात किंवा प्रवासात जर काही अडचण आली तर आपण क्रोधाने त्याची प्रतिक्रिया करू नये. आपण समजू शकतो की अडचणी आहेत आणि त्या सोडविण्यासाठी काही प्रयत्न करू शकतो.

आपण अगोदरच सावध होऊ शकतो, आणि क्रोध येणाऱ्या कारणांची चर्चा करून किंवा त्यावर उपाय शोधून तो हटवण्याचा प्रयत्न करू शकतो. या सर्व प्रक्रियेत क्रोधापासून वाचण्याचा प्रयत्न केला पाहिजे. क्रोधाने समस्या संपणार नाहीत तो केवळ आपला रक्तदाब वाढवेल, आपणास अस्वस्थता जाणवेल तसेच आपले मन सतत बेचैन राहील. दुसरे जे काही करतात त्यांना क्रोध थांबवू शकणार नाही. क्रोध केवळ आपल्याला आजारी व अस्वस्थ करतो. परंतू आपण शांत राहून आपल्या सर्व इंद्रियांना ताब्यात ठेवून अडचणींचा सामना करू शकतो आणि आपण चांगला परिणामकारक इलाज शोधू शकतो. आपल्यास समस्येचा उपाय शोधण्याची शक्ती देखील जास्त राहील... रागावर नियंत्रण आणण्यासाठी आपण काय पाऊल उचलावे ? प्रथम आपल्याला क्रोध येत आहे असे वाटते, तेव्हा लगेच काही बोलू नये आणि काही करू नये. आपण एक दीर्घश्वास घेतला पाहिजे. आपण स्वतःला त्या परिस्थितीपासून लांब नेले पाहिजे. एकांतात शांत बसून ध्यानअभ्यासास बसले पाहिजे. जर क्रोधाने भरलेले विचार मनात आले तर आपण स्वतःला विचारले पाहिजे की, क्रोधाच्या प्रेताला अजुन बलवान बनवू इच्छितो ? जर आपण त्याला हरवू इच्छितो, तर कथेतील वासुदेवा प्रमाणे आपण आपल्या क्रोधाला, क्रोधाच्या प्रेताचे पोषण न करता असे करू शकतो, आपणास असे समजले पाहिजे की, जितका जास्त वेळ आपण न बोलता शांत राहू, क्रोधाला तेवढी कमी उर्जा मिळेल आणि हळूहळू ते गायब होऊन जाईल.

चला आपण आपली शांती, संतुलन आणि समन्वयाने रागाला नष्ट करू. आपल्याला असे लक्षात येईल की, जरी अजुनही क्रोधा वाढण्याची परिस्थिती निर्माण झाली तरी आपण त्याचे गुलाम बनत नाही. आपण त्यातून शांततेने निघू शकतो. आपल्या शरीर, मन, आणि उर्जेचा अधिक रचनात्मक उद्देशासाठी वापर करू शकतो आणि आपण आधिपेक्षा जास्त आनंद आणि शांतीचा अनुभव घेऊ.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

पानी देने का समय भी निश्चित किया गया था । प्रकृति का भी अहवान किया गया था, तो प्रकृति का सहयोग भी हमें मिल रहा था । लहलहाते खेत को देख गाव के अन्य किसान आश्चर्यचकित हो जाते थे । जो पहले हंसते थे वही अब वाह! वाह! करने लगे थे, यह तो शिवबाबा का ही कमाल था।

मेरी खेती की जमीन रिजर्व फारेस्ट एरिया के नजदीक होने के कारण जंगली जानवरों से नुकसान होने का डर था, हुआ भी ऐसा ही । रात को पशुओं ने थोडा–सा फसल का नुकसान किया । तो मैंने बाबा से अमृतवेले योग में कहा कि बाबा इन जंगली जानवरों से फसल को कैसे बचाया जाये? तब बाबा ने मुझे ऐसी टचिंग करवायी कि देखो भाई! जमीन (खेत) में जो पैदावार होती है उसमें सबका हिस्सा होता है, इसमें १० प्रतिशत पशुओं का होता है इसलिए डरो मत, तुम्हारा कुछ ज्यादा नुकसान नहीं होगा।

तुम्हारा कुछ ज्यादा नुकसान नहीं होगा। सब से मैं निश्चित हो गया और बाबा से कहा कि ऐसा हो तो १५ प्रतिशत पशु जानवर खा जावें तो भी मुझे कोई हर्जा नहीं। ऐसा मैंने बाबा से कहा लेकिन आश्चर्य की बात तो यह थी कि तब से मेरे खेत में पशुओं ने आना ही बन्द कर दिया। खेत के नजदीक से चले जाते थे लेकिन हमारे खेत में नहीं आते थे तो यह भी बाबा का ही कमाल कहेंगे और शक्तिशाली याद के प्रयोग का भी नतीजा प्रैक्टिकल में देखने को मिला।।

फसल पक जाने पर मुझे ऐसा लगा कि मेरे संकल्प शिवबाबा की याद के प्रयोग से सिद्ध हो रहे हैं। आमतौर पर ग्रीष्मकालीन तिल की फसल अच्छी परवरिश और उचित समय पर पानी और खाद देने से एक बीघा जमीन में से १५० से २०० कि.ग्रा. पैदावार होती है, लेकिन इस शाश्वत प्राचीन योग के प्रयोग से और शिवबाबा की याद में अच्छे, शुद्ध एवं शुभ वायुप्रेरण देने से इतने अच्छे नतीजे देखने को मिले कि एक बीघा जमीन में से ३६० कि.ग्रा. उत्पादन हुआ जो मेरा संकल्प पूरा हुआ। इस तरह से योग के प्रयोग से अच्छे परिणाम प्राप्त कर सकते हैं। यह मेरा और मेरे परिवार का पूरा भरोसा है। अतः ज्ञानसूर्य और पवित्रता के सूर्य शिवबाबा की किरणों से ही इतनी अच्छी फसल सम्भव हुई है, यह मेरा दृढ निश्चय है।

मैं १४ साल से राजयोग का अभ्यास और ११ साल से यौगिक खेती कर रहा हूँ। मैं सबसे पहले पहले प्रातः ३.३० बजे उठते ही परमात्मा पिता से गुडमॉर्निंग करके, फ्रेश होकर योग कक्ष में बैठकर योग करता हूँ।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

पहिला वेडा : सूर्य किती वेडा आहे.
दुसरा वेडा : कसा काय?
पहिला वेडा : दिवसा उजेड असताना तो उगवतो आणि रात्री अंधार असताना उगवत नाही.

नातु : हॅलो, आजी इंद्रजित बोलतोय
आजी : कोण बोलतोय? नीट ऐकू येत नाहीये...
नातु : इंद्रजित बोलतोय म्हटलं
आजी : इंग्रजीत नको रे बाबा मराठीतच बोल

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्लीश)



सुप्रभात निश्चित उगवेल
अंधार नाहीसा होईल
व तुझा आवाज
सोनेरी प्रवाहात बुडवून टाक
म्हणजे तो आसोळ्या ऐकून
आकाशात लुप्त होईल

मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
भिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

७) मानसिक ताणतणाव : आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये स्त्रियांना बऱ्याच मानसिक ताणतणावांना सामोरे जावे लागते. त्यामुळे मनावर दडपण राहते. अशा परिस्थितीत बऱ्याच स्त्रियांना श्वेतप्रदराचा त्रास होतो. शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण असंतुलित झाल्यामुळे हा त्रास होतो. श्वेतप्रदराला दुर्गंधी, खाज, योनिभागी सूज येणे ही लक्षणे नसतील तर उपचाराची गरज नसते. ओंकार, प्राणायाम, ध्यानधारणेने मानसिक संतुलन व्यवस्थित राहते. म्हणून दैनंदिन जीवनात स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ काढावा. आयुर्वेदीय विचार सुरुवातीला वर्णन केल्या प्रमाणे कफज योनी व्यापत्, अचरणा योनी व्यापत् व उपप्लुता योनी व्यापत् हे तीन रोग श्वेतप्रदर व्याधीशी साम्य दाखवतात.

अ) कफज योनी व्यापत् : गुरू, मधुर, स्निग्ध, अभिष्यंदी पदार्थांचे अतिप्रमाणात सेवन केल्यामुळे कफ प्रकोप होतो. त्यामुळे योनिमार्गात बुळबुळीतपणा, शैथिल्य येते. खाज सुटते व योनिस्त्राव श्वेत व चिकट असतो.

चिकित्सा : कफज योनी व्यापत्ची चिकित्सा करताना रूक्ष आणि उष्ण गुणांची औषधी वापरावी लागतात. पिंपळी, मिरे, उडीद, बाळंतशेपा, कोष्ठ यांची वर्ती तयार करावी. ती योनीमध्ये धारण करावी. यामुळे योनीतील कफाचे शोधन होण्यास मदत होते. उत्तर बस्ती करताना कटू रसात्मक औषधांचा काढा आणि गोमूत्र यांचा वापर करावा. धातक्यादी तैलाचा पिचू योनीमध्ये धारण करावा.

ब) अचरणा योनी व्यापत् : आयुर्वेद दामध्ये हजारो व्याधींचे वर्णन केलेला अचरणा योनी व्यापत् हा खरे तर सध्याच्या जीवनामध्ये जास्त प्रमाणात दिसून येतो. योनिमार्गाची मासिक पाळीच्या वेळी व इतर वेळीसुद्धा नीट स्वच्छता ठेवली नाही, स्वच्छ अंतर्वस्त्रे वापरली नाहीत तर जंतुसंसर्ग होतो. ते जंतू खाज निर्माण करतात यालाच अचरणा योनी व्यापत् असे म्हणतात.

लहान मुली कुतुहलापोटी योनिभागात एखादी वस्तू घालतात. त्या वस्तूमुळे जखम होऊन जंतुसंसर्गाची लागण होते. यालादेखील आपण अचरणा योनी व्यापत् म्हणू शकतो. खरोखरच आयुर्वेदशास्त्र किती महान आहे याची प्रचिती आपल्याला आली असेल. कारण व्यवहारात श्वेतप्रदर याचे कारणांमुळे झालेला आढळून येतो. ज्या स्त्रियांना मधुमेहाचा आजार आहे, अशा स्त्रियांना याची लागण जास्त प्रमाणात झालेली आढळते. (क्रमशः)

– डॉ. शारदा निर्मल–महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

पद्मशाली युवा शक्ती ट्रस्टतर्फे तसेच पद्मशाली महिला शक्ती यांच्यावतीने गांधी मैदानातील श्री मार्कंडेय मंदिरात महाआरती करून गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप प्रसंगी योगेश म्याकल, सुमित इप्पलपेल्ली, दिपक गुंडू आदी.

शिक्षणात पुढे टाकलेले पाऊल माघारी फिरल्यास मोठे नुकसान

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर – कांपी करणारे विद्यार्थी फक्त पास होतात, मात्र कष्टाने अभ्यास करून मेरीटमध्ये येणारे विद्यार्थी आपले भवितव्य घडवितात. दहावी व बारावीनंतर आपले ध्येय स्पष्ट ठेऊन त्या दिशेने विचारपूर्वक वाटचाल करा. एकदा शिक्षणात पुढे टाकलेले पाऊल माघारी फिरल्यास मोठे नुकसान होते. स्वतःचे सामर्थ्य व आवड ओळखून त्या दिशेने वाटचाल केल्यास यश नक्की मिळणार असल्याची भावना आ. संग्राम जगताप यांनी व्यक्त केली.

पद्मशाली स्नेहिता संघमध्ये वतीने इयत्ता दहावी, बारावी व विविध स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आ. जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मानसोपचार तज्ञ व आयुर्वेदाचार्य डॉ. प्रसाद उबाळे, माकंडेय विद्यालयाच्या (श्रमिकनगर) मुख्याध्यापिका विद्या दगडे उपस्थित होत्या.

पुढे आ. जगताप म्हणाले की, गुणगौरवाने जीवनात ऊर्जा मिळते. चांगल्या वाईट गोष्टी जीवनात धडा शिकवतात. शिक्षण क्षेत्रातील पेपर फुटी व शिक्षणापर्यंत पोहचलेले राजकारण समाजासाठी घातक असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

डॉ. प्रसाद उबाळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या करियरची वाट सुस्पष्ट असावी. दिशा ठरवली नसेल तर तो विद्यार्थी भरकटला जातो. आपले करिअर निवडाल ते प्रामाणिकपणे व सचोटीने निवडून त्याच्यात यश प्राप्त करून जीवन समृद्ध बनविण्याचे त्यांनी सांगितले. तर करियरचे पॅकेज आणि पर्पज म्हणजे काय? हे स्पष्ट केले. विद्या दगडे यांनी मुलांना त्यांच्या जीवनात येणाऱ्या संकटांचा सामना करण्यास प्रोत्साहन द्यावे. संकटांना तोंड देण्याचे सामर्थ्य त्यांच्या निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र त्यांच्यावर बिंबवावे. संकटाने खचून जाणारा विद्यार्थी आयुष्यातील आपले ध्येय गाठू शकणार नसल्याने त्याच्यात सामर्थ्य निर्माण करण्यावे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात अध्यक्षा डॉ. रत्ना बह्मांल यांनी पद्मशाली स्नेहिता संघमध्या माध्यमातून मागील २३ वर्षापासून गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करून त्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. यामध्ये कधीही खंड पडलेला नसल्याचे स्पष्ट करून त्यांनी महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली.

पाहुण्यांचा परिचय रेखा बह्मेपल्ली, आरती छिंदम, सविता कोटा यांनी करून दिला. याप्रसंगी अनिल अलवाल हे महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन पीएसआयपदी रूजू झाल्याबद्दल व प्रसिध्दा बुरा एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. जिज्ञासा छिंदम, अथर्व मंगलारम यांनी सत्काराला उत्तर देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमासाठी रासकोंडा यांनी हॉटेल रेडियन्सचा हॉल उपलब्ध केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या बक्षीसांसाठी प्रमिला चिलका, लक्ष्मी गुंडू, विजया गुंडू, श्रीलता आडेप, वाय. प्रकाश टेलर, एस.एस. कम्युनिकेशनचे प्रमोद गुंडू, विद्या दगडे यांनी सहकार्य केले. याप्रसंगी ७० ते ८० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली चन्ना यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांची यादी वाचन रोहिणी पागा, सविता एक्कलदेवी, आरती छिंदम यांनी केले. आभार सविध सपना छिंदम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सविता एक्कलदेवी, विजया गुंडू, नीता बुरा, सुवर्णा पुलनाम, सीमा अंकाराम, कांचन कुंटला, रेखा मुरूड, कल्पना बुलबुले, पुनम वक्रम, प्रमिला वक्रम, पूजा म्याना, सोनी लयचेट्टी आदींनी परिश्रम घेतले.

पद्मशाली स्नेहिता संघमध्ये वतीने गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार करताना आ. संग्राम जगताप. समवेत मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रसाद उबाळे, मुख्याध्यापिका विद्या दगडे, डॉ. रत्ना बह्मांल आदी.

४०० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

पद्मशाली युवा शक्ती ट्रस्टचा उपक्रम

नगर – पद्मशाली युवा शक्तीच्या वतीने गेल्या सात वर्षापासून ४०० विद्यार्थ्यांना वही वाटप करण्यात येत आहे. त्या मुलांना हे वाटप करून खुप काही मोठ कार्य करतोय असे अजिबात नव्हते पण त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत हातभार लावण्याचा हा छोटासा प्रयत्न असे योगेश म्याकल यांनी सांगितले.

गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिर येथे भगवान श्री मार्कंडेय यांची महाआरती करून पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने व दानशूर व्यक्तींनी केलेल्या मदतीने ४०० गरजू विद्यार्थ्यांना वही वाटप केले असे दिपक गुंडू यांनी सांगितले.

यावेळी बोलताना सुमित इप्पलपेल्ली म्हणाले गेल्या सात वर्षापासून पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट विविध समाज उपयोगी कार्य करत आहेत. या वही वाटप उपक्रमांतर्गत तोफखाना, दातरंगे मळा, शिवाजी नगर, रंगारगल्ली, चितळे रोड, श्रमिकनगर, पदमानगर, सिव्हील हाडको, शिमला कॉलनी नागरदेवळे भिंगार, नित्यसेवा या भागातील गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकाच्या घरी जाऊन वही वाटप चे कार्य केले आहे असे सांगून पद्मशाली युवा शक्तीच्या वतीने दरवर्षी रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, योग शिबिर, विद्यार्थ्यांनसाठी करिअर व्याख्यान शिबिरे, विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि तरुणाचे सत्कार असे अनेक उपक्रम राबविण्यात येतात, असे त्यांनी सांगितले

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दिपक गुंडू, सुमित इप्पलपेल्ली, योगेश ताटी, सागर बोगा, योगेश म्याकल, श्रीनिवास इप्पलपेल्ली, नारायण मंगलारप, श्रीनिवास एल्लाराम, अजय म्याना, समार आरकल, सुरेखा विधे, उमा कुरापल्ली, सारिका सिद्दम, निता बह्मांल, लक्ष्मी म्याना, रेणुका जिंदम, सुनंदा नागुल यांनी परिश्रम घेतले.

पालकांनी आपल्या पाल्यांना पाठबळ देण्याची गरज

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

नगर – सध्या महाराष्ट्रात सीबीएससी आणि इतर बोर्ड आहेत, याचूर्ली एकच बोर्ड होता. त्या विविध बोर्डाचा अभ्यासक्रम वेगवेगळा असल्याने विद्यार्थी वर्गाची गुणवत्ता बाबत तुलना करू नये. आपल्या पाल्यांना त्या क्षेत्रात करिअर करावेसे वाटते त्याला ते क्षेत्र निवडू द्या. आपल्या पाल्यास पालकांनी पाठबळ देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

रोटरी इंटिग्रिटी क्लब, संदिपान ॲकेडमीतर्फे शालेय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा यतीमखाना येथे सत्कार प्रसंगी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ.

संदिपान ॲकेडमी यांच्या विद्यमाने रोटरी इंटिग्रीटी क्लब, शालेय व कनिष्ठ महाविद्यालयातील टॉपर गुणवत्ताधारक विद्यार्थी वर्गाचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये अहमदनगर यतीमखाना संचलित अहमदनगर मराठी हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थी वर्गाचा सत्कार करण्यात आला.

यावेळी चंदना शहा, डॉ. सुधा व डॉ.प्रकाश कांकरिया, माजी समाज कल्याण अधिकारी रफिक मुन्शी, बालराजू, पूजा पटनायक उपस्थित होते.

'द लाईट' चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंगचे आयोजन

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने 'द लाईट' चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंग बांद्रा येथील ग्लोबस पीव्हीआर सिनेमामध्ये १७ जून रोजी आयोजित करण्यात आले. हे स्क्रीनिंग विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी दिग्दर्शक सुजित सरकार बी के शोभा दीदी, बी के स्मिता दीदी, बी के शिखा दीदी, बी के डॉ दीपक हरके, व बीके सदस्य उपस्थित होते. द लाईट चित्रपटात प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचा स्थापनेपासूनचा इतिहास एनीमेशन रुपात मांडण्यात आला आहे.

आनंदधाम येथे वाघ्या फॉडेशनच्यावतीने मुक्या प्राण्यांच्या कत्तलीच्या निषेधार्थ श्रद्धांजली अर्पण करताना कुंदनऋषीजी म.सा. समवेत सुमित वर्मा, मयुरी बनकर, मंगेश पटेकर, हर्षल कटारिया आदी.

प्राण्यांविषयी प्रेम, भावना, दया संदर्भात सुरु असलेले वाघ्या फाउंडेशनचे काम कौतुकास्पद

कुंदनऋषीजी महाराज यांचे प्रतिपादन; आनंदधाम येथे वाघ्या फाउंडेशनतर्फे मुक्या प्राण्यांना श्रद्धांजली

नगर – समाजामध्ये आपण सर्वजण वावरत असताना मुक्या प्राण्यांवर प्रेम करा, श्री भगवान महावीर स्वामी यांनी संदेश देताना सांगितले की जगा आणि जगू द्या, सर्वांना समान अधिकार आहे, प्राण्यांची रक्षा करा मात्र आपल्या देशामध्ये प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात कत्तल केली जात असून नागरिकांमध्ये जनजागृती करावी, वाघ्या फाउंडेशनच्या वतीने मुक्या प्राण्यांची सेवा केली जात असून नागरिकांमध्ये प्राण्यांविषयी प्रेम, भावना, दया या संदर्भात माहिती दिली जात आहे हे काम कौतुकास्पद आहे, समाजात चांगले काम करणाऱ्यांचे जीवन सार्थक होत असते, सर्वांचा आत्मा एकच असतो, त्यामुळे प्राण्यांची हत्या केल्याने चांगली गोष्ट साध्य होत नाही असे प्रतिपादन कुंदनऋषीजी महाराज यांनी केले

देशभर मुक्या प्राण्यांच्या होत असलेल्या कत्तलीच्या निषेधार्थ आनंदधाम येथे वाघ्या फाउंडेशनच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी कुंदनऋषीजी महाराज, अलोकऋषीजी महाराज, वाघ्या फाउंडेशनचे सुमित वर्मा, मयुरी बनकर, मंगेश पटेकर, हर्षल कटारिया, दर्शना मुजुमदार, ऋषिकेश परदेशी, संदेश सूर्यवंशी, रितेश रणमले, सुरज जपे आदी उपस्थित होते. यावेळी अलोकऋषीजी महाराज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले

समाजाने केलेले कौतुक व सत्कार मूठभर मास चढवणारा असतो

डॉ. सूचित तांबोळी यांचे प्रतिपादन

नगर –उच्च शिक्षण घेतांना जे ठरवले आहे ते सत्या करण्यास जिद्द खूप महत्वाची असते. प्रत्येक वेळेस यशच मिळेलच असे नाही. अपयश हे कधीच कुचकामी ठरत नाही. जीवनातील यशात आई वडिलांचा सहभाग व सहकार्य खूप महत्वाचे आहे. आपल्या मुलांना आपणच चांगले ओळखतो त्यामुळे करिअर करताना काय करायचे हे दोघांनी एकमेकांशी बोलायला हवे त्यासाठीच पालक आणि मुलांमध्ये सुसंवाद हवा. आपल्या समाजाने केलेले कौतुक व सत्कार मूठभर मास चढवणारा असतो. ब्राम्हण समाज आज पूर्ण जगात यशस्वी होत आहे. ब्राम्हण बिझिनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन उत्कृष्ट काम करत समाजाला एकत्रित करून सामाजिक जाणीवेतून व्यावसायीकांना पुढे आणत आहेत, असे प्रतिपादन बालरोगतज्ज्ञ डॉ. सूचित तांबोळी यांनी केले.

नगरच्या ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन (बिबिएन) संस्थेतर्फे आयोजित १० वी आणि १२ वीच्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाप्रसंगी डॉ.तांबोळी बोलत होते. यावेळी समर्थ मंडळ ऋग्वेद भवनचे विश्वस्त सुरेश क्षीरसागर, समुपदेशक डॉ. नेहा तांबोळी, गुजर गौड ब्राह्मण समाजाचे सहसचिव नरेश व्यास, पारीक ब्राह्मण समाजाचे सचिव रामनिवास पारीक आदींसह बिबिएनचे पदाधिकारी, गुणवंत विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सत्कारार्थी १७५ हून अधिक विद्यार्थ्यांना निसर्गाप्रती प्रेम निर्माण होवून झाडांच्या संगोपनाची सवय व्हावी यासाठी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तिपत्रासह झाडांची रोपे देवून सन्मान करण्यात आला.

नेहा तांबोळी म्हणाल्या, करिअर निवडीसाठी डॉक्टर इंजिनिअर पेक्षा इतरही खूप क्षेत्रांच्या संधी उपलब्ध आहेत. वयाच्या योग्य टप्प्यात आपला कोल कोठे आहे, हे समजणे आवश्यक असते. सध्याच्या स्पर्धेच्या युगात बारावीपर्यंत अनेक कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. त्याची रूजुवात विद्यार्थी दशेतून होत असल्याने त्याकडे लक्ष केंद्रित करावे. करिअर निवडीसाठी योग्य मार्गदर्शन घ्यावे त्याचा चांगला उपयोग होतो.

सुरेश क्षीरसागर म्हणाले, समर्थ रामदास स्वामीं प्रमाणे विद्यार्थ्यांनी समर्थ आणि सामर्थ्यवान बनावे. त्यासाठी योग्य मार्गदर्शन घेऊन समाजासाठी आणि देशासाठी काम करावे. नरेश व्यास, रामनिवास पारीक यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी स्नेहल धर्माधिकारी यांनी स्वागत केले, निखिल कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात बिबिएन बेलोकेअर असोसिएशनची माहिती दिली. उमेश भालेराव यांनी सूत्रसंचालन केले तर अध्यक्ष विनीत मुंगी यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हेमंत लोहमावकर, शिल्पा सोमणी, अमित परंडकर, यशवंत आंबेकर, अशोक बकोरे, अमित काळे यांनी परिश्रम घेतले.

नगरच्या बिबिएन संस्थेतर्फे १० वी व १२ वीत उच्च श्रेणीन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रसंगी डॉ.सूचित तांबोळी, सुरेश क्षीरसागर, डॉ. नेहा तांबोळी, नरेश व्यास, सचिव रामनिवास पारीक आदींसह बिबिएनचे पदाधिकारी.

बिबिएन संस्थेतर्फे समाजातील १७५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

राधिका भरतनाट्यम नृत्य अकादमीच्या यशस्वी विद्यार्थ्यांनीसमवेत संचालिका सौ.कविता भांबरे– घोलप.

राधिका भरतनाट्यम् ॲकॅडमीच्या उज्वल निकालाची परंपरा कायम

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या एप्रिल २०२४ सत्राचा निकाल टप्पा टप्प्याने जाहीर होत आहे. यामध्ये आदर्शनगर, कल्याण रोड येथील राधिका भरतनाट्यम नृत्य अकादमीच्या विद्यार्थ्यांनी संचालिका सौ.कविता भांबरे– घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रदिपक यश मिळवत यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे : प्रारंभिक– रितीशा कोरडे, अनुष्का चोबे, ओवी गायकवाड, रिया राऊत, हिमानी बोरुडे, रेणुका खांदे, गार्गी अनमुले, श्रेया शिंदे, आराध्या कवाष्टे. प्रवेशिका प्रथम– संतानिका लोडे, स्वरा जाधव, वेदांगी बोरडे, इशिका भागवत, प्रगती अगरवाल. प्रवेशिका पूर्ण – रेणुका शिंदे, सिद्धी आडेप, वेदिका गावडे, प्रणाली रसाळ, ईश्वरी कवाष्ट, प्रचिती शिंदे, तनिष्का दळवी. मध्यमा प्रथम– मृणालिनी शेरकर. विशारद प्रथम– गौरी तिकोने. विशारद पूर्ण– सिद्धी गांधी, तुलसी ओस्तवाल, कृष्णा लगड.

या सर्व विद्यार्थ्यांना भरतनाट्यम परीक्षे करीता केंद्र प्रमुख देऊळगावकर, सहाय्यक आश्लेषा पोतदार, पृथ्वी सुपेकर, मंदार फुलारी यांचे सहकार्य लाभले. आदर्शनगर येथील पारनाथ ढोलळे, प्राचार्य खांसेराव शितोळे, प्रकाश लगड, संतोष दसासे, ॲड.सुधीर शेटे, विजय गाडळकर, भगवान काटे, राजेंद्र पवार, परशुराम कोतकर यांनी अभिनंदन करून लवकरच सत्कार समारंभाचे आयोजित केले आहे.

कचरा संकलन गाडीचे निंबळकमध्ये खा. निलेश लंके यांच्या हस्ते लोकार्पण

नगर – नगर तालुक्यातील निंबळक गावातील कचरा संकलन करण्याचे काम ग्रामपंचायत कडून करण्यात येते. त्यासाठी ग्रामपंचायतीकडे दोन लहान गाड्या व एक ट्रॅक्टर कार्यरत आहे. परंतू गावाची लोकसंख्या व गावाचा वाढता पसारा पाहता ही वाहने कमी पडत होती. म्हणून ग्रामपंचायत कार्यालयाकडून पंधराव्या वित्त आयोगातून उपलब्ध निधीतून दोन टन कचरा वाहून नेण्याची क्षमता असलेल्या आयशर कंपनीचे दोन नवीन वाहने घेतली आहेत. यामुळे कचरा संकलन सुरळीत होईल. यापैकी एक वाहन पुढील आठवड्यात मिळणार असून तात्यात मिळालेल्या वाहनाचे लोकार्पण खा. लोकनेते निलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आले.

निंबळक येथे कचरा संकलन गाडीचे लोकार्पण करताना खा. निलेश लंके. समवेत सरपंच प्रियंकाताई लामखडे, अजय लामखडे आदी.

या प्रसंगी बोलत असताना खा. निलेश लंके यांनी ग्रामस्थांना आपल्या घरातील कचरा हा प्लॅस्टिक पिशवीत घालून इतरत्र कोठेही रस्त्याच्या कडेला न फेकता कचरा संकलन गाडीतच कचरा टाकून ग्रामपंचायतीस सहकार्य करावे आणि आपल्या गावाचे, परीसराचे आरोग्य अबाधित ठेवावे असे आवाहन केले.

या प्रसंगी निंबळकच्या सरपंच प्रियंकाताई लामखडे, अजय लामखडे, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे व्हॉईस चेअरमन तथा महाराष्ट्र राज्य गवंडी समाज संघाचे राज्याध्यक्ष अविनाश आळंदीकर, बाबासाहेब पगारे, महेश म्हस्के, विठ्ठल काळे, प्रतीक कोतकर, अशोक शिंदे, अनिल भोर, अक्षय दिवटे, गोटीराम शिंदे, घोलप आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

सांगळेगल्लीतील श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक विभागाच्या शाळेत नवागतांचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण सोहळाप्रसंगी माजी नगरसेवक गणेश कवडे, माजी नगरसेविका सौ. सोनाली चितळे, संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर, संस्थेचे व्हा. चेअरमन व शालेय समिती चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे कार्यकारणी सदस्य सुनील भालेराव, मुख्याध्यापक अजय महाजन आदी. (छाया – उदय जोशी)

श्री समर्थ विद्या मंदिर प्राथमिक विभाग सांगळेगल्लीत नवागतांचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण सोहळा

नगर – सांगळेगल्लीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्राथमिक विभागाच्या शाळेत नवागतांचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण सोहळा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नवागतांना गुलाबपुष्प व पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी नगरसेवक गणेश कवडे, माजी नगरसेविका सौ. सोनाली चितळे हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर हे होते. संस्थेचे व्हा. चेअरमन व शालेय समिती चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे कार्यकारणी सदस्य सुनील भालेराव, मुख्याध्यापक अजय महाजन आदी उपस्थित होते.

माजी नगरसेवक गणेश कवडे म्हणाले की, मुलांनी खूप अभ्यास करा, देशाचे चांगले नागरिक बना, देशाची सेवा करा, असे सांगितले.

सोनाली चितळे म्हणाल्या की, खूप अभ्यास करा, खूप ज्ञान मिळवा, स्वतःची स्वप्न पूर्ण करा. असे सांगितले.

सुरेश क्षीरसागर यांनी आपल्या मनोगतात मुलांना शाळेच्या पहिल्या दिवसाच्या शुभेच्छा दिल्या व आपल्या हातातून चांगले कार्य घडत राहो, स्वतःची प्रगती करा असे सांगितले. प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक अजय महाजन, सूत्रसंचालन श्रीमती लीना बंगाळ व आभार श्रीमती सोनाली माकरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश मेढे, सौ. वैशाली मगर, शंकर निंबाळकर, संदीप गायकवाड, श्रीमती मोहिनी नाटाळे, श्रीमती रुपाली धोत्रे, कु. नेहा दरवडे यांनी मार्गदर्शन केले.

आपल्याकडे जे जास्त आहे, ते गरजूंना देणे ही आपली संस्कृती

गोपाल मनियार यांचे प्रतिपादन; माहेश्वरी युवा संघटन व रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी आयोजित शिबीरात २३१ रक्त बाटल्यांचे संकलन

महेश नवमीनिमित्त माहेश्वरी युवा संघटन व रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी यांच्यावतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – आपल्या संस्कृतीत सण-समारंभाला फार महत्व आहे. यानिमित्त समाज एकत्र येऊन आपले सुख-दुःख वाटून घेत असतो. महेश नवमी हा माहेश्वरी समाजाचा सर्वात मोठा सण-उत्सव. यानिमित्त माहेश्वरी युवा संघटना समाजामध्ये चांगल्या पद्धतीने काम करत आहे. त्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून त्याचा लाभ मिळवून देत असल्याने समाजाला त्याचा मोठा फायदा होत आहे. आज रक्तदान शिबीराचा उपक्रम राबवून सामाजिक दायित्व जपले आहे. रक्तदानाने अनेकांचे प्राण वाचले जाऊ शकतात, यासाठी प्रत्येकाने रक्तदान करणे गरजेचे आहे. आपल्याकडे जे जास्त आहे, ते गरजूंना देणे ही आपली संस्कृती आहे. त्यानुसारच माहेश्वरी समाजाचे सुरु असलेले कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीचे चेअरमन गोपाल मणियार यांनी केले.

महेश नवमीनिमित्त माहेश्वरी युवा संघटन व रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी यांच्यावतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी गोपाल मनियार, जयप्रकाश काबरा, उद्योजक जितेंद्र बिहाणी, मधुसूदन सारडा, श्रीगोपाल धूत, लक्ष्मीकांत झंवर, किसन बंग, विश्वनाथ कारसट, राजेंद्र मोलू, अशोक बंग, राजेंद्र केंग्रेट, मथुराबाई झंवर, अनुश्री झगडे, देवराम साठे, शशिकांत पुंडलिक, माहेश्वरी युवा संघटनचे अध्यक्ष शाम भुतांडा, प्रोजेक्ट चेअरमन संग्राम सारडा, पियुष झंवर आदि उपस्थित होते.

यावेळी स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयप्रकाश काबरा तर स्वागताध्यक्ष म्हणून उद्योजक जितेंद्र बिहाणी, प्रकल्प प्रमुख म्हणून गोविंदा जाखोटिया, सुमित चांडक, शेखर असावा, प्रतिक सारडा आदिंनी काम पाहिले.

यावेळी जयप्रकाश काबरा म्हणाले, माहेश्वरी समाजाचे संघटन हे चांगल्या पद्धतीने सुरु असून, विद्यार्थी, युवक, नव उद्योजक, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांमुळे समाजोन्नतीचे काम होत आहे. सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त आपली संस्कृती, परंपरा जपण्याचे काम अशा उपक्रमातून होत आहे. समाजाला दिशा देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी अध्यक्ष श्याम भुतडा म्हणाले, माहेश्वरी युवा संघटनेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाचा विकास व्हावा, याद्वीतीने विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यांचा लाभ अनेकांना होत आहे. युवा संघटनेच्या उपक्रमास मिळालेला प्रतिसाद आणि त्याचे फलित हे संघटनेचा आत्मविश्वास वाढविणारा ठरला आहे. महेश नवमीनिमित्त रक्तदान शिबीरातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. उपक्रमातून समाजाचे संघटन करुन समाजाला दिशा दिशा देण्याचे काम ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असल्याचे सांगितले.

रक्तदान शिबीरात आनंदऋषीजी हॉस्पिटल व जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तसंकलनाचे कार्य करण्यात आले. या शिबीरात २३१ रक्त बाटल्यांचे संकलन झाले. स्नेह मिलन कार्यक्रमासाठी माहेश्वरी इंजिनिअर्स, बिल्डर्स, बिल्डींग मटेरियल ग्रूपचे सहकार्य लाभले. गुणवंत विद्यार्थ्यांना मनिष सोमाणी यांच्यावतीने बक्षिसे देण्यात आली.

सूत्रसंचालन गोविंदा जाखोटिया व रिद्धी जाखोटिया यांनी केले.

कार्यक्रमासाठी माहेश्वरी युवा संघटनचे पदाधिकारी विशाल झंवर, संकेत मानधने, सुमित खटोड, भुषण काबरा, अनिकेत बलदवा, पवन बिहाणी, गोविंद दरक, गोविंदा काकाणी, कुणाल लोया, मुकुंद जाखोटीया, पवन बंग, पवन बिहाणी, सिद्धार्थ झंवर, सुमित बिहाणी, योमेश सोमाणी, संकेत अहुल, मधुर बिहाणी यांनी परिश्रम घेतले.

अ.भा.म. नाट्य परिषद, मुंबईचा विशेष पुरस्कार स्व.रितेश साळुंके यांच्या कुटुंबीयांना प्रदान

मुंबई – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती, मुंबईच्या वतीने विशेष कार्यकर्ता पुरस्कार स्व.रितेश साळुंके यांना नाट्यसंमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, अभिनेते मोहन जोशी, अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, अशोक हांडे, कोषाध्यक्ष सतीश लोटके, नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वर्गीय रितेश साळुंके यांच्या पत्नी सपना साळुंके व कन्या समिक्षा साळुंके यांना प्रदान करण्यात आला.

नाट्य परिषदेच्या माध्यमातून होशी रंगभूमीवर कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास सदरचा पुरस्कार दिला जातो. स्व. रितेश साळुंके यांनी अहमदनगर जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील होशी रंगभूमीवर मोलाचे कार्य केले आहे. स्व. साळुंके यांनी नगर मधील रंगकर्मी प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून अनेक वर्ष एकांकिका, नाटके सादर केली आहेत. अनेक कलाकार त्यांच्या संस्थेतून नावारूपाला आले आहेत. उत्तम अभिनेते, लेखक, दिग्दर्शक आणि कार्यकर्ते म्हणून ते महाराष्ट्रभर परिचित होते. नाट्य क्षेत्राचा पदवी अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला होता. शालेय जीवनापासून त्यांनी बीडच्या परिवर्तन प्रतिष्ठान या नाट्यसंस्थेच्या माध्यमातून रंगभूमीवर काम करायला सुरुवात केली होती.

नाट्य परिषद, मुंबईचा विशेष पुरस्कार डॉ. जब्बार पटेल, अभिनेते अशोक सराफ, कोषाध्यक्ष सतीश लोटके, अभिनेते प्रशांत दामले यांच्या उपस्थितीत स्विकारताना स्व. रितेश साळुंके यांच्या पत्नी सपना साळुंके, समिक्षा साळुंके.

राज्य नाट्य स्पर्धा, स्वागताध्यक्ष करंडक, अक्षर करंडक एकांकिका स्पर्धा तसेच जिल्ह्यात आणि ग्रामीण भागात होणाऱ्या स्पर्धांना त्यांचे मोठे सहकार्य मिळाले आहे. समिक्षक, परीक्षक, आयोजक तसेच स्पर्धा प्रमुख म्हणून त्यांनी नगरच्या रंगभूमीला मोठे योगदान दिले आहे. नगर येथे झालेल्या ८३ व्या नाट्य संमेलनात त्यांनी महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.

राज्यात दरवर्षी होणाऱ्या विविध ठिकाणच्या नाट्य संमेलनात त्यांनी सक्रीयपणे कार्य केले आहे. होशी रंगभूमीवर राज्यात होणाऱ्या विविध उपक्रमांचा ते अभ्यास करीत असत. मुंबई येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यास प्रमुख पाहूणे म्हणून खा. शरद पवार, उद्योग मंत्री उदय सामंत उपस्थित होते.

स्व. रितेश साळुंके यांच्या स्मरणार्थ नाट्य परिषद, नगर शाखा लवकरच उपक्रमांचे आयोजन करणार असल्याची भावना नाट्य परिषद, मुंबईचे कोषाध्यक्ष सतीश लोटके व नगर शाखेचे अध्यक्ष अमोल खोले यांनी व्यक्त केली.

स्व.रितेश साळुंके यांच्या कार्याची दखल घेत नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबईने त्यांच्या कार्याचा गौरव करून स्व. रितेश साळुंके यांना न्याय दिला अशी भावना नगर शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, उपाध्यक्ष शशिकांत नजान, नियामक मंडळ सदस्य क्षितीज झावरे, प्रा. संजयकुमार दळवी यांनी व्यक्त केल्या.

सारसनगर येथील कै. दामोदर विद्यालयात पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन व पाठ्यपुस्तकांचे वाटप प्रसंगी प्रा. शिवाजीराव विधाते, मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के, इतर शिक्षक वर्ग.

विधाते विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

शाळेचा पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन पाठ्यपुस्तकांचे वाटप

नगर – सारसनगर येथील कै. दामोधर विधाते (मास्टर) प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शाळेचा पहिला दिवस प्रवेशोत्सव उपक्रमाने साजरा करण्यात आला. गुलाबपुष्प व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेच्या आवारात रांगोळी काढून, फुग्यांची सजावट करण्यात आली होती.

संस्थेचे सचिटणीस प्रा. शिवाजीराव विधाते यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के, संतोष सुसे, शिक्षकवर्ग सविता सोनवणे, लता म्हस्के, राधाकिसन क्षीरसागर, दरवडे योगेश, भाऊसाहेब पुंड, जावळे निता, अमोल मेहेत्रे, सारिका गायकवाड, सचिन बर्डे आदी उपस्थित होते.

प्रा. शिवाजीराव विधाते यांनी शिक्षणाने मनुष्य सुसंस्कृत होऊन त्याची प्रगती होते. परिस्थिती बदलण्याची शक्ती शिक्षणात असून, श्रमिक कष्टकऱ्यांच्या मुलांनी उच्च शिक्षणाने आपला उत्कर्ष साधण्याचे त्यांनी आवाहन केले.

मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. उपस्थितांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

वडील हा कुटुंबाचा कणा असतो

दिलीप सातपुते यांचे प्रतिपादन

बोल्हेगाव येथील किड्स सेकंड होम स्कूलमध्ये पालकदिनी पालकांचा सन्मान करताना शिवसेना शहरप्रमुख दिलीप सातपुते.

नगर – आज पर्यंत मदर्स डे अनेक ठिकाणी साजरे केलेले अनुभवले परंतु पहिल्यांदाच फादर डे साजरा होत असल्याचे मी पहात असून ही बाब कौतुकासपदच आहे. वडील हा कुटुंबाचा कणा असतो, वडील हयात असताना आपण त्यांच्या कडे लक्ष देत नाही व ते गेल्या नंतर आपण रडत बसतो त्या पेक्षा ते हयात असतानाच त्यांची काळजी घ्या ते म्हणतील तसे वागा नक्कीच त्यांना आनंद होईल. पालकांनी सुध्दा आपल्या पाल्यावर आपले निर्णय लादू नका, त्यांचे सुप्त कलागुणांना वाव द्या, असे आवाहन अध्यक्षस्थानावरून बोलतांना शिवसेना शहर प्रमुख दिलीप सातपुते यांनी केले.

विश्व निर्मल फॉडेशन संचलित किड्स सेकंड होम प्री प्रायमरी स्कूल मधे पालक दिना निमित्त सर्व पालकांचा सन्मान बाळासाहेब ठाकरे शिवसेना शहर प्रमुख दिलीप सातपुते व शाळेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा यांचे हस्ते शाळेच्या वतीने करण्यात आले.

बोल्हेगाव येथील किड्स सेकंड होम स्कुलमध्ये पालक दिन साजरा

या वेळी माताजी श्री निर्मलादेवी यांचे प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्याचे हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. लक्ष्मीकांत पारगावकर, खजिनदार संदीप गांगर्डे व अर्थव बोज्ञा उपस्थीत होते.

यावेळी श्रीनिवास बोज्ञा यांनी शाळेबाबत माहिती दिली व पालकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. पारगावकर, संदीप गांगर्डे, अर्थव बोज्ञा व पालकांच्यावतीने गौतम सातपुते यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी शाळेतील मुलांनी फादर्स डे निमित्त भाषणे केलीत तर काही मुलांनी वडिलांच्या आधारावर असलेल्या हिंदी गाण्यावर सामूहिक डान्स केला.

शाळेच्या मुख्याध्यापिका उषा गरड यांनी सूत्रसंचालन केले. उपमुख्याध्यापिका संगीता गांगर्डे यांनी पाहुण्याचे स्वागत केले तर पर्यवेक्षक सौ. दिपाली हजारे यांनी आभार मानले.

यावेळी शाळेच्या शिक्षिका सौ. रुपाली जोशी, सौ. पूजा चव्हाण, सौ. आरती हिवारकर, सौ. अर्चना चव्हाण, वैष्णवी नजन, निकिता पाळदे, सीमा हिवाळे व पालक वर्ग उपस्थित होते.

मूलभूत प्रश्नांपासून विकासाची कामे केल्याने शहराच्या विस्तारीकरणाला चालना मिळाली

आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; वाल्हेराज बाबा बिडकर मार्ग नामकरण सोहळा व ख्रिश्चन समाज दफनभूमी संरक्षण भिंत कामाचा शुभारंभ

नगर – सर्वांच्या सहकार्यातून शहर विकासाचे चांगले काम उभे राहत आहे, गेल्या १० वर्षांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून मोठा निधी प्राप्त झाला असून एप्च्यएप्च्यएपने विकासाची कामे पूर्ण होत आहे. पर्यटन, क्रीडा क्षेत्रबरोबरच सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून नगरकरांशी ऋणानुबंध निर्माण झाले आहे. शहराच्या उपनगरांच्या मूलभूत प्रश्नांपासून विकासाची कामे केल्यामुळे विस्तारीकरणाला चालना मिळाली आहे. नागापूर बोल्हेगाव परिसराला शहरीकरणाचे रुप प्राप्त झाले आहे. येथील औद्योगिक वसाहतीमुळे या परिसरात कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात राहत असून त्यांचे विकासाचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले आहे. वाल्हेराज बाबा बिडकर यांच्या आशीर्वादाने हा भाग पवित्र झाला आहे. त्यांचे धार्मिकतेचे कार्य महान आहे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

नागापूर येथील वाल्हेराज बाबा बिडकर मार्ग नामकरण सोहळा व ख्रिश्चन समाज दफनभूमी संरक्षण भिंती कामाचा शुभारंभ करताना आ. संग्राम जगताप. (छाया – लहू दळवी)

नागापूर येथील वाल्हेराज बाबा बिडकर मार्ग नामकरण सोहळा व आ. संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून ख्रिश्चन समाज दफनभूमी संरक्षण भिंत कामाचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी नगरसेवक राजेश कातोरे, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, माजी नगरसेवक दत्ता पाटील सप्रे, हनुमंत कातोरे, माजी सरपंच दत्ता पाटील सप्रे, साहेबराव सप्रे, सुरेश बनसोडे, लहानु पाटील भोर, नवनाथ कातोरे, भालचंद्र भाकरे, शाम महाराज बिडकर, चंदू काळे, निलेश भाकरे, विश्वास भाकरे, सुरेश भिंगारदिवे, कुलुप सिंग, राणी भाकरे, राहुल कातोरे, नरेश पवार, नवनाथ पवार, सुभाष लबडे आदी उपस्थित होते.

राजेश कातोरे म्हणाले की, ख्रिश्चन समाजाच्या दफनभूमीच्या संरक्षण भिंतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. हा प्रश्न आ. संग्राम जगताप यांनी मार्गी लावला आहे तसेच वाल्हेराज बाबा बिडकर यांचे नाव नागापूर रस्त्याला देण्यात आले आहे. बोल्हेगाव नागापूर परिसरामधील विविध विकास कामे पूर्ण करण्यासाठी मोठा निधी उपलब्ध झाला, आहे असे ते म्हणाले.

अहमदनगर महानगरपालिकेचे कामगार अधिकारी अबरार शेख हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना श्रीमती सुनिता शिंदोरे, धनंजय शिंत्रे, बाबासाहेब डवरे आदी.

महापालिकाचे कामगार अधिकारी अबरार शेख सेवानिवृत्त

नगर – अहमदनगर महानगरपालिकाचे कामगार अधिकारी अबरार शेख ३१ मे रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या सेवेतुन सेवानिवृत्त झाले. त्यांनी कामगार अधिकारी तथा कोर्ट विभाग प्रमुख या पदांचा कार्यभार यशस्वीरित्या सांभाळला.

त्यांचे औद्योगिक व कारकीर्दीमध्ये जिल्हा न्यायालय मा. सर्वोच्च न्यायालय व वक्फ बोर्ड येथील विविध प्रकरणांमध्ये त्यांनी आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या वकीलांना योग्य प्रकारे माहिती देऊन या प्रकरणांचा पाठपुरावा करुन त्यांचे निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लावण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. महापालिकेमध्ये त्यांची ओळख अजातशत्रु अशी आहे.

तसेच, कोर्ट विभागाकडे काम केलेले बागवान अब्दुल गनी फकीर महंमद हे देखील महानगरपालिकेच्या प्रदिर्घ सेवेतुन सेवानिवृत्त झाले. त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागात सेवा दिली. त्यांचे रिव्हीजन विभागातील कामकाजाबाबतची सेवा उल्लेखनिय आहे.

अबरार शेख व बागवान अब्दुल गनी फकीर महंमद यांचे प्रदिर्घ सेवेनंतर ते सेवानिवृत्त झाले त्या प्रसंगी अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांना निरोप देण्यात आला.

यावेळी श्रीमती सुनिता शिंदोरे, धनंजय शिंत्रे, बाबासाहेब डवरे, सी.पी. देशमुख, निलेश राऊत, ललिता सिरसुल, सौ. रुपाली बिज्रा, दिनेश वारनौळ, पुंडलीक मुनगेल, गिरीश जामगावर, श्रीमती. राधा आहेर, संजय पटेकर, अब्दुल गनी बागवान, समर्थ चव्हाण, सौ. सुनिता सातपुते हे उपस्थीत होते.

अर्थ 'नीट'चा

दोस्तांनो, वजन कमी करण्यासाठी, तंदुरुस्तीसाठी जीमची महागडी मेंबरशीप घेण्याची गरज नाही. जीममध्ये घाम गाळण्यासोबतच इतर अनेक पद्धतींनी तुम्ही वजन कमी करू शकता. यासाठी पैसेही खर्च करावे लागणार नाहीत. शारीरिक कष्ट मात्र घ्यावे लागतील. वजन कमी करण्याच्या या पर्यायांकडे प्रथम दुर्लक्ष होतं. मात्र दैनंदिन जीवनातले साधेसे बदल तुमच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवू शकतात. पण यासाठी मुळात आळस सोडायला हवा. बाईकचा वापरही टाळायला हवा. व्यायामाव्यतिरिक्तच्या या पर्यायांना 'नीट' म्हणजेच 'नॉन एक्सरसाइज थरमॉजेनेसिस' असं म्हटलं जातं. 'नीट' म्हणजे नेमक काय हे समजून घेऊ.

फिटनेस फंडा

खाणं, व्यायाम आणि झोप या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी वापरली जाणारी शारीरिक ऊर्जा म्हणजे 'नीट' असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. दुकानापर्यंत चालत किंवा सायकलवरून जाणं, जिने चढणं, बागकाम, पाळीव प्राण्यांला फिरायला नेणं, घरची कामं करणं अशा ऑक्टिव्हिटींचा यात समावेश होतो. बाईकऐवजी चालत जाणं, लिफ्टऐवजी जिने चढणं अशा जीवनशैलीतील छोट्या छोट्या बदलांमुळे दिवसभरातल्या खर्च होणाऱ्या कॅलरींचं प्रमाण वाढत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. हे छोटे छोटे बदल अगदी सहज करता येतात. आपल्या आरोग्यरक्षणासाठी कंटाळा बाजूला ठेवायला हवा. प्रत्येकवेळी कॉलेज किंवा ऑफिसला चालत जाण शक्य नसतं. त्याऐवजी तुम्ही सायकल वापरु शकता. ऑफिसमधले सहकारी किंवा कॉलेजमधल्या मित्रमैत्रिणींसोबत चालत गप्पा मारा. शक्य तितका वेळ उभे राहण्याचा प्रयत्न करा. घरात झाडं असतील तर त्यांना पाणी घाला. अशा शारीरिक हालचालींमुळे तुम्ही तंदुरुस्त व्हाल.

संसदेतील तरुण चेहरा

मित्रांनो, १८ व्या लोकसभेत २५ ते २६ व्या वयोगटातील चार सदस्य आहेत. त्यात २५ वर्षे वयाच्या शांभवी चौधरीचा समावेश होतो. नरेंद्र मोदींनी बिहारच्या दरभंगा येथील रॅलीमध्ये तिला 'सर्वात तरुण उमेदवार' म्हणून संबोधले होते. दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून समाजशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलेली आणि लेडी श्री राम कॉलेजमधून ग्रॅज्युएशन पूर्ण केलेली शांभवी आज संसदेत युवावर्गाचं प्रतिनिधित्व करण्यास सिद्ध आहे. त्यामुळेच या सर्वात तरुण दलित महिलेविषयी जाणून घ्यायलाच हवे.

१८ व्या लोकसभेतील एक स्पर्धक म्हणून समस्तीपूरमधून जिंकण्यासाठी शांभवीने मतदानाच्या ४५ दिवस प्रचारास सुरुवात केली. ती टीमसह रोज जवळपास १५-१६ तास मेहनत करायची. एनडीएचा एक भाग म्हणून लढत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासूनच्या दोन कार्यकाळात केलेल्या कामाबद्दल बोलण्यास तिने प्राधान्य देणे स्वाभाविक होते. यंदाही प्रत्येक मतदारसंघात मोदी फॅक्टर होता आणि एनडीएचे उमेदवार लोकांना मोदींना तिसऱ्यांदा मतदान करायला सांगत होते. हे लक्षात घेऊनच मतांचे आवाहन करताना शांभवीने मोदींबरोबरच मुख्यमंत्री नितीश कुमार आणि लोक जनशक्ती पक्षाचे (रामविलास पासवान) प्रमुख चिराग पासवान यांनी केलेल्या चांगल्या कामाकडेही लोकांचे लक्ष वेधले. एनडीएचा राष्ट्रीय जाहीरनामा, एलजेपी (आरपी) च्या जाहीरनाम्याव्यतिरिक्त तिने समस्तीपूरसाठी स्थानिक जाहीरनामाही प्रसिद्ध केला. समस्तीपूरचा खासदार म्हणून आपण काय करणार हे या जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद केले होते. तिचा

अधिव्हर

मतदारसंघ म्हणजे शेतकरीबहुल पट्टा आहे. सहाजिकच जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांसाठीच्या कल्याणकारी योजना, ऍग्रोटेक आणि सॉफ्टवेअर क्षेत्राचा विकास याबद्दलचा मॅप देण्यात आला होता. प्रचाराच्या त्या ४५ दिवसांमध्ये घेतलेल्या प्रत्येक सभेत आणि या विकास कार्यक्रमांप्रती विश्वास वाटल्यामुळेच समस्तीपूरच्या जनतेने आपल्याला मोठ्या मताधिक्याने निवडून दिल्याचे शांभवीचे म्हणणे आहे.

भारतातील सर्वात तरुण खासदार म्हणून नव्हे तर आधी मला तुमची मुलगी म्हणून स्वीकारा, नंतरच तुम्हाला माझ्यात एक खासदार दिसेल, असे ती आज लोकांना सांगते. राजकारणातील लोकांनी स्वत:ला जनतेशी जोडले जाण्याचे मूल्य गमावले आहे, असे ती म्हणते. म्हणूनच मतदारांशी निखळ आणि द्वेष संबंध जोडण्याचा प्रयत्न करण्याचा तिचा मानस आहे. तरुण असल्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रचारात ती शारीरिक, मानसिक, भावनिकरित्या सक्रियपणे सामील होऊ शकली. आता जनतेचे प्रश्न सोडवतानाही हीच सक्रियता कामी येईल, असे तिचे म्हणणे आहे. एकूणच इतक्या तरुण वयात बिहारमधील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च फरकाने (९,८७,२५१ मतांनी) झालेला तिचा विजय तरुणाईसाठी प्रेरण आणि आश्वासक आहे, असे म्हणावे लागेल.

युवापिढीची राजकारणाकडे बघण्याची दृष्टी संमिश्र दिसते. काही जण याला आपला प्रांत नसल्याचे समजतात तर फार्हींना यात कारकिर्द घटबण्याची संधी दिसते. अशांसाठी वयाच्या अवघ्या २५ वर्षे मोदी सरकारमध्ये सामील झालेल्या शांभवी चौधरीचा आदर्श प्रेरणादायी ठरेल. आज या सर्वात तरुण उमेदवाराविषयी जाणून घेऊ या.

जोश

शेर की जुबानी

बडा अजीब सा सफर है,
जिसके लिए लिखूं वही बेखबर है।
आंखे कितनी भी छोटी क्यूं न हो,
ताकत तो उनमें सारे आसमान
देखने की होती है।

मीठी यादों से गिर रहा था ये
आंसू,
फिर भी न जाने ये क्यूं खारा था।

टेक गाईड

परदेशप्रवास होणार सुकर

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाने प्रवासी प्रक्रिया क्षमतांमध्ये लक्षणीय सुधारणा जाहीर केल्या आहेत. यामध्ये प्रति तास अंदाजे ८,००० प्रवाशांना हाताळण्याची क्षमता वाढवणे आणि त्यांची विमानतळावर थांबण्याची वेळ कमी करणे समाविष्ट आहे. या बदलाचा एक महत्त्वाचा भाग डिजीयात्रा, बायोमेट्रिक-आधारित प्रणालीचा विस्तार हा आहे. हे प्रवाशांना बोर्डिंग पास किंवा आयडी पडताळणीशिवाय चेकपॉईंटमधून सहजपणे जाण्याची परवानगी देते. विमानतळ ऑपरेटर एमआयएएलने दोन्ही टर्मिनलमध्ये अशा डिजीयात्रा प्रवेशाचा लक्षणीय विस्तार केला आहे. या अंतर्गत एकूण एंट्री लेन (ई-गेट्स) ची संख्या २४ वरून ६८ पर्यंत वाढली आहे. यामध्ये केवळ डिजीयात्रा वापरकर्त्यांसाठी ३४ लेन राखून ठेवल्या आहेत.

नवे काही

आयफोनधारकांच्या सुविधा वाढल्या

आता तुम्ही एका टॅपने आयफोनवरून दुसऱ्या फोनवर रक्कम ट्रान्सफर करू शकाल. याशिवाय प्रथमच कॉल रेकॉर्डींग आणि कस्टमाइज्ड होम स्क्रीन यासारख्या वैशिष्ट्यांचा वापर करण्यासही तुम्ही सक्षम असाल. टेक कंपनी ॲपलने अलिकडेच अनेक कृत्रिम बुद्धिमत्ता साधने सादर केली. कंपनी आपल्या आय फीचर्सला 'ॲपल इंटेलिजन्स' असे म्हणत आहे. ही नवीन वैशिष्ट्ये आयपॅड आणि मॅकमध्ये सिलिकॉन चिपसह वापरता येऊ शकतात.

वी अलर्ट

हाईड युवर टायपिंग स्टेटस

ऑडियो-व्हिडिओ कॉल्स आणि इंस्टंट मेसेजिंगसाठी मायक्रोसॉफ्टचं स्काईप हे सर्वोत्तम ॲप आहे. या ॲपमध्ये नुकतीच काही उपयुक्त फीचर्स जोडली गेली आहेत. यामुळे तुम्ही तुमचं टायपिंग स्टेटस लपवू शकता. यासाठी स्काईपच्या टूल्स ऑप्शनमध्ये जा. यावर क्लिक केल्यावर स्काईपचं सेटिंग पेज ओपन होईल. यानंतर 'शो ॲडव्हान्स ऑप्शन्स'वर क्लिक करा. इथे 'शो व्हेन आय ॲम टायपिंग' हा पर्याय ऑफ करा. यानंतर तुमचं टायपिंग स्टेटस हाईड होईल.

उपयुक्त

घरीच क्लिनिंग करावे लागते?

घरातील स्वच्छतेचे काम सोपे करणारी ब्रॉंझ स्मार्ट मॉपिंग टेक्नॉलॉजी आता व्हॅक्यूम क्लीनरला नवे रूपडे देत आहे. अलिकडेच बाजारात १३ जीएक्सेक्ट छगड कोर प्रोसेसर व ग्रीमियम थ्री स्टेज क्लीनिंग सिस्टमसह आय रोबो व्हॅक्यूम क्लीनर दाखल झाला आहे. तो एअर पॉवरसह काम करतो. त्यामध्ये बसवलेले ब्रश मळकट फरशीवरील तसेच कार्पेटवरील धूळ सहज काढतो. यात डर्ट डिटेक्शन सेन्सर असल्यामुळे घरातील सर्वात अस्वच्छ भाग ओळखला जातो आणि तिथे जाण्यासाठी तसेच संबंधित जागा पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी रोबोला आज्ञा दिली जाते. वाय-फाय कनेक्टेड रोबोट व्हॅक्यूम क्लिअर वेगवेगळ्या क्लीनिंग मोडसह येतात. वर उल्लेख केलेल्या आयरोबो व्हॅक्यूम क्लीनरची किंमत २९,५०० रुपये इतकी आहे.

समुद्रांचा अभ्यास

पृथ्वीचा बराच मोठा भूभाग समुद्राने व्यापला आहे. या समुद्राच्या तळाशी अनेक रहस्य दडली आहेत. समुद्र, महासागरांमधली बरीचशी गुपितं आपल्याला माहीतच नाहीत. म्हणूनच विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन इंजिनिअरींग, मेडिकलपेक्षा वेगळी वाट निवडणारे विद्यार्थी ओशनोग्राफीचा विचार करू शकतात. ओशनोग्राफी ही अर्थ सायन्सची एक शाखा आहे. यात अर्थातच समुद्राचा अभ्यास केला जातो. समुद्रकिनाऱ्यावरचे बदल टिपले जातात. समुद्राशी संबंधित विविध विषयांचा समावेश ओशनोग्राफीमध्ये होतो.

वेगळ्या वाटा

मरीन बायोलॉजीमध्ये समुद्री जीवनाचा अभ्यास होतो. इथल्या जीवसृष्टीची उत्पत्ती कशी झाली असावी, याबाबत सतत संशोधन केलं जातं. केमिकल ओशनोग्राफीमध्ये समुद्रातल्या केमिस्ट्रीचा अभ्यास होतो. जिओलॉजिकल ओशनोग्राफीत समुद्र तळ अभ्यासला जातो. फिजिकल ओशनोग्राफीमध्ये लाटा, भरती-ओहोटी तसंच अन्य काही बाबींचा अभ्यास होतो.

या विषयात पदवी मिळवल्यानंतर सरकारी तसंच खाजगी क्षेत्रांमध्ये संधींची कवाडं खुली होतात. पर्यावरण रक्षणासोबतच पाणी व्यवस्थापन, जल प्रदूषण, खनिज तेल उद्योग अशा क्षेत्रांमध्ये काम करता येतं. अंगात धडाडी असेल तर तुम्ही ओशनोग्राफीचा अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तम करीअर घडवू शकता.

'भावनिक प्राणी' आहात?

आपण कॉफीरेट शिडीवर चढत जातो, तसतसे वाढीच्या संधी कमी आणि आव्हानात्मक होतात हे गुपित नाही. म्हणूनच कारकीर्द नेहमीच ऊर्ध्वगामी असणार नाही हे समजून घ्यायला हवे. कारकिर्दीत अनेक ठिकाणी तुम्हाला अडकल्यासारखे वाटते. आवडीच्या किंवा समाधानकारक आणि आव्हानात्मक भूमिका मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. यामुळे काही 'भावनिक प्राणी' अस्वस्थ होतात. निराश होतात. त्यांना स्वत:चा रागही येतो. पण ही अवस्थाही संयमाने हाताळणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वप्रथम आपल्या भावना मान्य करा पण त्याकडे फार लक्ष देऊ नका. भावना नियंत्रणात केल्याने तुमच्या पुढे जाण्याच्या क्षमतेला गती मिळू शकते. त्यामुळेच भावनांचा निचरा होण्यासाठी एखादा विश्वासू मित्र, कुटुंबातील सदस्य, भागीदार, मार्गदर्शक किंवा थेरपिस्ट यांच्याशी बोला आणि लवकरात लवकर या फेजमधून स्वत:ला बाहेर काढा. महत्त्वाचे म्हणजे भावनिक रोलरकोस्टरची कालमर्यादा सेट करा. कारकिर्दीमध्ये अपयश आल्यास कोणालाही दोष देऊ नका तर पुढील तार्किक वाटचाल करण्यासाठी कशावर काम करणे आवश्यक आहे हे बघा आणि त्यावर जवळच्या लोकांचे अभिप्राय विचारा. तुम्ही आपल्या वरिष्ठांनाही विश्वासात घेऊ शकता. यावेळी त्यांना काही प्रश्न विचारा. जसे की, 'या भूमिकेसाठी कोणती कौशल्ये सर्वात महत्त्वाची होती?' किंवा 'मी स्थान मजबूत करू शकलो असतो अशी काही विशिष्ट क्षेत्रे आपल्या संस्थेत होती का?' हे प्रश्न तुमची समजूत आणि परिस्थितीचा सामना करत पुढे जाण्याची तयारी दाखवून देतील.

जाणून घ्या

कदाचित एखाद्या कार्यक्षेत्रात तुमच्याकडे वेगळ्या कौशल्याची किंवा नेतृत्व शैलीची आवश्यकता असल्याचे जाणवत असेल तर ते पूर्णपणे प्राप्त करण्याच्या मागे लागा. यातूनच परिस्थिती आणखी चांगल्या संधीकडे नेईल, यावर विश्वास ठेवा. वैयक्तिक विकास योजना तयार करण्यासाठी मुळ आणि प्राथोजकांशी चर्चा करा. यातून तुम्हाला सुधारित करिअरचा मार्ग सापडू शकतो.

...तर बिनधास्त पुढे जा



प्रत्येक नात्यामध्ये थोडा का होईना, संघर्ष असतोच. परंतु जोडपी त्यांचे निराकरण कसे करतात यावरुन त्यांच्यातील नातेसंबंधाचा टोन सेट होतो.

मॅच मेकिंग

एखादी चूक झाल्यावर माफी मागायला न घाबरणारी व्यक्ती एखाद्या दुर्मीळ रत्नासारखी असते. अहंकार बाजूला ठेवणे आणि माफी मागणे हे वाटते त्यापेक्षा कठीण आहे. म्हणूनच अशा व्यक्तीला डेट करत असाल तर नाते फुलवण्याचा अवश्य प्रयत्न करा. संभाव्य जोडीदार वाईट परिस्थितीत कसा वागतो हे बघा. भागीदार आपल्या कृतींवर विचार करण्यास वेळ घेतो आणि जबाबदारी स्वीकारतो तेव्हा ते परस्पर आदराचे लक्षण आहे, हे समजून घ्या. परस्परांशी असणारे नाते तुमच्यासाठी सुरक्षित स्थान असले पाहिजे. जोडीदार असे वातावरण तयार करत असेल तर कोणत्याही भीतीशिवाय तुम्ही मोकळेपणाने व्यक्त होऊ शकता. आपला खरा चेहरा घेऊन त्याच्यासमोर वावरु शकता. पार्टनर तुम्हाला यादृष्टीने आश्वस्त करत असेल, तर डेटिंग बिनधास्त सुरू ठेवा.

मनोहारी ठोसेघर धबधबा

दोस्तांनो, मान्सून पिकनिकची मजा काही वेगळीच असते. या दिवसात जिकडेतिकडे धबधबे कोसळत असतात. म्हणूनच मित्रमंडळींसोबत एखाद्या धबधब्याच्या ठिकाणीच भटकंती करायला हवी. डोंगरातून अगावर कोसळणारी पाण्याची धार अलगद झेलायला हवी. असंच एक ठिकाण म्हणजे ठोसेघर धबधबा. साताऱ्यातला हा धबधबा मान्सून वीकेंड पिकनिकसाठी बेस्ट ठिकाण आहे.

भटकंती

पश्चिम घाटाच्या कुशीत वसलेला हा धबधबा आपल मन मोहवून टाकतो. निसर्गरम्य असं हे ठिकाण आपल्याला आकर्षित करतं. इथे निवांत क्षण घालवता येतात. साताऱ्याच्या जवळपास अनेक धबधबे आहेत. त्यापैकी एक म्हणजे ठोसेघर धबधबा. सज्जनगड आणि पवनचक्क्यांचं मनोहारी दृश्य बघत आपण ठोसेघरला पोहोचतो. पावसाळ्यात या धबधब्याचा धुक्याची चादर पसरलेली असते. मस्त ढगाळ वातावरणात धबधब्याखाली भिजताना एकदम भारी वाटतं. मोठा ग्रुप असेल तर तुम्ही खूप धमाल करू शकता. इथली भातशेतं आपल्याला खुणावतात. धुक्याची चादर पसरल्यानंतर समोरचं काहीच दिसत नाही. सातारापासून २० किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे. सातारा रेल्वेस्थानकावर उतरून तुम्ही पुढे जाऊ शकता. स्वत:च्या वाहनानेही प्रवास करता येईल. कोल्हापूरपासून ५५० किलोमीटरवर हा धबधबा आहे. त्यामुळे यंदाच्या मान्सूनमध्ये ठोसेघरला नक्की जा.

चविष्ट बटाटा पुलाव

दोस्तांनो, तुम्ही टॉमेटो राईस, कोथी भात, पुलाव असे प्रकार खाल्ले असतील. आता बटाटा पुलाव करून बघा. हॉस्टेल असो किंवा घर, आपल्याकडे बटाटे असतातच. अडचणीला उपयोगी पडणारा हा बटाटा घालून तुम्ही खमंग पुलाव बनवू शकता. पटकन होणारी ही रेसिपी जाणून घेऊ.

सामग्री: एक वाटी तांदूळ, दोन ते तीन बटाटे, पुदिन्याची पानं, कोथिंबिर, दोन हिरव्या मिरच्या, चमचाभर लिंबाचा रस, एक तुकडा दालचिनी, जीरं,मीठ, तेल

कृती: तांदूळ धुवून अर्धा तास पाण्यात भिजवून ठेवा. पाणी काढून टाकून घ्या भांड्यात भात शिजवून घ्या. भात शिजवताना थोडं मीठ आणि घाला. तेलामुळे भात मोकळा होईल. पाणी काढून भात एका ताटात पसरवून घ्या. गार होऊ द्या. आता पुदिन्याची पानं, थोडी कोथिंबिर आणि मिरच्या एकत्र वाटून घ्या. यात चमचाभर लिंबाचा रस आणि थोडं मीठ घाला. बटाटे उकडून सोलून घ्या. त्याचे छोटे चौकोनी तुकडे करा. आता कढईत थोडं तेल गरम करा. जीरं आणि दालचिनीचा तुकडा घाला.

झटपट रेसिपी

मिनिटभर परता. मग यात पुदिना- कोथिंबिरीची वाटलेली पेस्ट आणि बटाटे घालून नीट परतून घ्या. यात शिजवलेला भात घाला. हलवून घ्या. चवीनुसार मीठ घाला. दोन मिनिटं शिजू द्या. दह्यासोबत हा पुलाव खाता येईल.

नगर शहर विधानसभेची जागा शिवसेनेला मिळावी

सर्व पदाधिकारी, नगरसेवक यांचा एकमुखी ठराव; येणाऱ्या प्रत्येक निवडणुका 'उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना' ताकदीने लढणार : विलास घोगरे

नगर – नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले आहे. महाविकास आघाडीच्या एकत्रित प्रयत्नाने हे शक्य झाले आहे. यामध्ये शिवसेनेचा मोठा वाटा राहिला आहे. त्याचप्रमाणे येणाऱ्या विधानसभेसाठी ही महाविकास आघाडी पूर्ण ताकदीने ही निवडणुक लढविणार आहे. त्यासाठी शिवसैनिकांनी आतापासूनच कामाला लागावे. नगर शहर हा शिवसेनेचा बाल्लेकिल्ला राहिलेला आहे. शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक जनतेच्या प्रश्नांसाठी पुढाकार घेत आहे, ही चांगली बाब आहे. स्व.अनिल राठोड यांचे या मतदारसंघावर नेहमीच वर्चस्व राहिले आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत हा मतदार संघ शिवसेनेकडे कसा राहिल, यासाठी प्रयत्न करु. पदाधिकाऱ्यांनी मांडलेल्या भावना वरिष्ठांपर्यंत पोहचविण्यात येतील. तसेच येणाऱ्या मनपा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे वर्चस्व कसे राहील, यासाठी शिवसैनिकांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन शिवसेना विधानसभा संपर्कप्रमुख विलास घोगरे यांनी केले.

शिवसेना ठाकरे गटाचे नगर शहर विधानसभा संपर्कप्रमुख विलास घोगरे नगर येथे आले असता त्यांचा शहर शिवसेनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा, जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे, संचालक प्रशांत गायकवाड, प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक विपुल शेटिया, लकी खुबचंदानी आदी उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

शिवसेना ठाकरे गटाचे नगर शहर विधानसभा संपर्कप्रमुख विलास घोगरे नगर येथे आले असता त्यांचा शहर शिवसेनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा, जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे, संचालक प्रशांत गायकवाड, प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक विपुल शेटिया, लकी खुबचंदानी आदी उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

आला. यावेळी शहरप्रमुख संभाजी कदम, युवा सेना सहसचिव विक्रम राठोड, माजी महापौर भगवान फुलसौंदर, संजय शेंडगे, अनिल बोरुडे, रवी वाकळे, हर्षवर्धन कोतकर, बाळासाहेब बोराटे, सचिन शिंदे, योगिराज गाडे, शाम नळकांडे, अमोल येवले, प्रशांत गायकवाड, विजय पठारे, दत्ता जाधव, परेश लोखंडे, संतोष गेनप्पा, दत्ता कावरे, दिपक खैरे, संग्राम कोतकर, सुरेश तिवारी, अशोक दहिफळे, बबलू शिंदे, श्रीकांत चेमटे, संदिप दातरंगे, गौरव ढोणे, अरुण झेंडे, मुन्ना भिंगारदिवे, राजेंद्र भगत, पप्पू भाले, सुनिल त्रिपाठी, विशाल वालकर, सुरेश क्षीरसागर, अण्णा घोलप, अभिजित अष्टेकर आदिंसह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी संभाजी कदम यांनी नगर शहर शिवसेनेच्या काऱ्याचा आढावा संपर्कप्रमुख विलास घोगरे यांना सादर केला. त्यांनीही नगरमध्ये शिवसेनेचे सुरु असलेल्या कार्याचे कौतुक केले. यावेळी संभाजी कदम यांनी नगर विधानसभेची जागेवर माजी मंत्री स्व.अनिल राठोड हे पाच वेळा निवडून आले होते. त्यामुळे ही जागा शिवसेनेला मिळावी, असा ठराव केला. त्यास विक्रम राठोड यांनी अनुमोदन दिले व सर्वच पदाधिकाऱ्यांनी त्यास एकमुखी पाठिंबा दिला.

यावेळी भगवान फुलसौंदर यांनी नगर मनपात गेल्या २० वर्षात शिवसेनेने चार महापौर दिले आहेत, तसेच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीचा खासदार झाला आहे. त्यामुळे येणारी विधानसभा व मनपा निवडणुकीत भगवा फडकल्याशिवाय राहणार नाही, असे सांगितले.

यावेळी विक्रम राठोड यांनी युवा सेनेच्या माध्यमातून युवकांचे मोठे संघटन सुरु आहे. युवकांच्या प्रश्नांसाठी युवासेना कार्यरत असल्याचे सांगितले.

यावेळी पदाधिकारी, शिवसैनिकांनी संपर्कप्रमुख यांच्याकडे आपला भावना व्यक्त केल्या. तसेच संघटन मजबूत करण्यासाठी आम्ही एकत्रित प्रयत्नशील असल्याचे सर्वांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांचा माजी आ.अरुण जगताप यांच्या निवासस्थानी सत्कार

राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे व महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी माजी आमदार अरुण जगताप यांच्या निवासस्थानी भेट दिली असता त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा, जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे, संचालक प्रशांत गायकवाड, प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक विपुल शेटिया, लकी खुबचंदानी आदी उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे नगरमध्ये आले असता त्यांचा सकल राजस्थानी समाजातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक संजय चोपडा, जिल्हा उपाध्यक्ष परेश पुरोहित व अजय भोसले

अनाहत तबला अकॅडमीचे संगीत परीक्षेत यश

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने (केंद्र क्र.९९) एप्रिल आणि मे २०२४ या सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेत तबला या विषयात अनाहत तबला अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त करुन १००% निकालाची परंपरा कायम ठेवली.

परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे – प्रारंभिक – साईराज मुरकुटे (विशेष योग्यता). सर्व प्रथम श्रेणी – आर्जव पटनी, श्रीरंग तोंडे, स्वराज कुलकर्णी, आराध्य भालेराव, सोहम जाधव. प्रवेशिका प्रथम – शार्दूल खोझूम (विशेष योग्यता), प्रथम श्रेणी – आकृती असनीकर, सार्थक भोंग. प्रवेशिका पूर्ण प्रथम श्रेणी – प्रसाद लामरूड, संकेत भणगे, पूर्वेश भणगे, द्वितीय श्रेणी – आयुष बोंदाडे, अन्वय पाणे. विशारद प्रथम प्रथम श्रेणी – सुपर्ण प्रताप. सर्व विद्यार्थ्यांना अनाहत तबला अकॅडमीचे संचालक प्रसाद सुवर्णपाठकी यांचे मार्गदर्शन लाभले.

अखिल भारतीय नाट्यपरिषद अहमदनगर उपनगर शाखेच्या अध्यक्षपदी प्रसाद बेडेकर

नगर – अखिल भारतीय नाट्यपरिषद अहमदनगर उपनगर शाखेची कार्यकारणी बैठक नुकतीच पार पडली. परिषदेचे अध्यक्ष क्षितिज झावरे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्याच्या कार्यकाळातील लेखाजोखा कार्यकारणीसमोर मांडण्यात आला. तसेच पुढील अध्यक्ष म्हणून प्रसाद बेडेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच चैताली जावळे यांची प्रमुख कार्यवाहपदी फेर निवड करण्यात आली.

प्रसाद बेडेकर हे गेल्या दोन दशकापेक्षा जास्त काळ नाट्यपरिषदेत तसेच नाट्यक्षेत्रात कार्यरत असून सारडा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

या बैठकीला क्षितिज झावरे, चैताली जावळे, संजय लोळगे, सुदर्शन कुलकर्णी, प्रशांत जठार, अभय गोले, पी.डी. कुलकर्णी, विद्या जोशी, जालिंदर शिंदे, गणेश सपकाळ आदी कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

एमएचटी-सीईटी परिक्षेत श्रावणी चोथे राज्यात प्रथम

नगर – कु. श्रावणी कैलास चोथे हिने एमएचटी सीईटी (पी.सी.बी.) परीक्षेत १०० पर्सेंटाइल मिळवून राज्यात प्रथम आली. तसेच तिने नीट परीक्षेत ६१४ गुण मिळवून उत्तीर्ण झाली.

१२ वी परीक्षेत ८९.५० टक्के गुण मिळवून प्रियदर्शिनी कॉलेजमध्ये प्रथम आली. नियमित अभ्यास व वेळेचे व्यवस्थित नियोजन यामुळे तिला यश प्राप्त झाले. तसेच तिला आई-वडील, शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या 'ओबीसी'तून किरण पतके बिनविरोध

नगर – भिंगार येथील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या महिला राखीव च्या २ जागा बिनविरोध झाल्यानंतर मंगळवारी (दि.१८) इतर मागास प्रवर्गातही दाखल असलेल्या २ अर्जापैकी सुदाम तुळशीराम गांधले यांनी अर्ज मागे घेतल्याने किरण पतके यांची बिनविरोध निवड झाली आहे.

संस्थेच्या महिला राखीव मतदार संघात वैशाली वर्धमान बोरा व अंजली नितीन शिंगवी यांचेच अर्ज शिल्लक राहिल्याने या दोघींची बिनविरोध निवड झाली आहे. तर इतर मागास प्रवर्गातून किरण पतके यांची निवड झाली आहे. त्यामुळे संस्थेच्या ३ जागा बिनविरोध झाल्या आहेत. संस्थेच्या सर्वसाधारण मतदार संघात १२ जागांसाठी १८ अर्ज दाखल होते. त्यातील बिपिनचंद्र बन्सीलाल लुणिया, प्रमोद माणवंद मुनोत, विनोद चंपालाल पोखरणा या तिघांनी शुक्रवारी माघार घेतली आहे. त्यामुळे आता १२ जागांसाठी १५ जणांचे अर्ज शिल्लक राहिले होते. मंगळवारी रतिलाल सिमरतमल गुगळे यांनी माघार घेतल्याने १२ जागांसाठी १४ अर्ज शिल्लक राहिले आहेत.

सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २७ जून पर्यंत उमेदवारांना माघारीची मुदत देण्यात आली आहे. निवडणुकीतील अंतिम उमेदवारांची यादी २८ जून रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर ७ जुलै रोजी मतदान घेण्यात येऊन त्याच दिवशी निकाल जाहीर करण्यात येणार आहे. मात्र ही निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अल्ताफ शेख हे काम पाहत असून त्यांना संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र मेहेर हे सहाय्य करत आहेत.

गुणवंत विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार अनेक संधी : अमोल सायंबर

नगर – आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करुन त्यादृष्टीने नियोजन केले पाहिजे. आज १०वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांना आपले गुणवत्तेनुसार अनेक संधी आहेत. आपण कशात यशस्वी होऊ शकते हे ठरवून त्या क्षेत्रात आपले करिअर करावे. स्पर्धा परिक्षेतील प्रश्न हे आपण शाळेत घेतलेले शिक्षणाशी संबंधित असतात त्यामुळे शालेय शिक्षण महत्वाचे आहे. दुसऱ्याचा विचार न करता स्वतःबद्दल विचार करुन त्यादृष्टीने मार्गक्रमण केले पाहिजे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारामुळे त्यांना प्रोत्साहन मिळणारच आहे, त्याच बरोबर इतरांनाही प्रेरणा मिळणार आहे. तिळवण तेली समाज ट्रस्टच्या उपक्रमातून समाजोन्नतीचे चांगले काम होत आहे, असे प्रतिपादन मास्टर माईंड अॅकेडमीचे संचालक अमोल सायंबर यांनी केले.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मास्टर माईंड अॅकेडमीचे अमोल सायंबर, डॉ.राहुल साळूंके, रमेश गवळी, रविंद्र करपे, वैभव देशमुख, पो.ना.योगेश घोडके, विजय दळवी, राजेंद्र धारक, गणेश धारक, वैभव शिंदे, गणेश गवळी, योगेश भागवत, पप्पू घोडके, कालिदास क्षीरसागर, अध्यक्ष प्रसाद शिंदे आदि.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माईंड अॅकेडमीचे डॉ.राहुल साळूंके, रमेश गवळी, रविंद्र करपे, वैभव देशमुख, पो.ना.योगेश घोडके, विजय दळवी, राजेंद्र धारक, गणेश धारक, वैभव शिंदे, गणेश गवळी, योगेश भागवत, पप्पू घोडके, कालिदास क्षीरसागर, अध्यक्ष प्रसाद शिंदे आदि.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मास्टर माईंड अॅकेडमीचे अमोल सायंबर, डॉ.राहुल साळूंके, माजी नगरसेवक रमेश गवळी, तौलिक महासंघाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष रविंद्र करपे, जिल्हा बालसंहाण अधिकारी वैभव देशमुख, पो.ना.योगेश घोडके, विजय दळवी, राजेंद्र धारक, गणेश धारक, वैभव शिंदे, गणेश गवळी, योगेश भागवत, पप्पू घोडके, कालिदास क्षीरसागर उपस्थित होते.

वैभव देशमुख म्हणाले, पालक व मुलांनामधील संवाद मोबाईलमुळे कमी होत चालला आहे. मोबाईल जसा गरजेचे आहे, तसा घातकही आहे, त्याचा उपयोग कामापुरताच झाला पाहिजे. शालेय जीवनात मार्क कमी मिळाले तरी स्पर्धा परिक्षांच्या माध्यम तून तुम्ही यशस्वी होऊ शकता. पालकांनी मुलांच्या कलेने घेऊन त्यांना आवडत्या क्षेत्रात करिअरची संधी द्या, म्हणजे भविष्यात ते नक्कीच यशस्वी होतील, असे सांगितले.

पो.ना.योगेश घोडके यांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून होणारी फसवणूकी विषयी माहिती देऊन ऑनलाईन ऑफरला बळी न पडता सोशल मिडियाचा मर्यादीत उपयोग करा. अडचण असल्यास संबंधितांकडे तातडीने तक्रार करा, असे आवाहन केले.

ट्रस्टचे अध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी ट्रस्टच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी उपाध्यक्ष मनोज क्षीरसागर, खजिनदार प्रकाश सँदर, सचिव शोभना धारक, विश्वस्त सागर काळे, गोकूळ कोटकर, दत्तात्रय डोळसे, शशिकांत देवकर, सौ.निता लोखंडे आदिंसह ओंकार लोखंडे यांनी उपक्रमाचे नियोजन केले.

प्रास्तविक दत्तात्रय डोळसे यांनी केले सूत्रसंचालन अबदा लोखंडे व गौरी शिंदे यांनी केले तर आभार प्रसाद शिंदे यांनी मानले. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थी, पालक व समाज बांधव उपस्थित होते.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा, विश्रामबाग येथे पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव आणि मोफत पाठ्यपुस्तक वितरणप्रसंगी मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण. समवेत मुख्याध्यापिका उज्वला कळमकर, पारुनाथ ढोकळे आदी.

उत्तुंग यशासाठी प्रामाणिक प्रयत्न हवेत

डॉ. बाळाराजू करी यांचे प्रतिपादन; बालक मंदिर शाळेत मुलांचे स्वागत

नगर – प्रत्येक विद्यार्थ्याने देशाचा चांगला नागरिक झाले पहिजे. आपली संस्कृती, परंपरेला धरुन परिस्थितीशी संघर्ष करा. प्रामाणिकपणे व चिकाटीने अभ्यास करुन उत्तुंग यश मिळवा, असे प्रतिपादन सांदिपानी अॅकेडमीचे डॉ. बाळाराजू करी यांनी केले.

दिल्लीगेट येथील परिवर्तन प्रतिष्ठान संचलित बालक मंदिर महिला मंडळ या शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ प्रसंगी सांदिपानी अॅकेडमीचे डॉ. बाळाराजू करी. समवेत शाळेतील विद्यार्थी व शिक्षक.

दिल्लीगेट येथील परिवर्तन प्रतिष्ठान संचलित बालक मंदिर महिला मंडळ या शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ उत्साहाने झाला. यावेळी ते बोलत होते.

परिवर्तन प्रतिष्ठानने बालक मंदिर शाळेचा कायापालट करण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे नवकरच शाळेपुढे 'प्रवेश बंद'ची पाटी लावावी लागेल, असा विश्वास डॉ. बाळाराजू यांनी व्यक्त केला.

सकाळी शाळेतील सर्व शिक्षिकांनी मुलांचे औक्षण करुन स्वागत केले. शाळेतील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी डॉ. बाळाराजू करी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष चर्वीट करंदीकर, उपाध्यक्षा योगिता चौधर, सचिव वैद्य अनिकेत घोटणकर तसेच महिला मंडळाच्या ज्योतीताई केसकर व विद्याताई होलेझुर उपस्थित होत्या.

बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका व शिक्षिकांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

सुट्टी संपली आता मोबाईलच्या दुनियेतून बाहेर पडा

जुबेर पठाण यांचे प्रतिपादन

नगर – लॉकडाऊन पासून मुलांना मोबाईल चे व्यसन जडले आहे. मैदानी खेळ खेळण्याऐवजी मोबाईल गेम विद्यार्थी खेळताना आढळून येतात. यावर्षीचा उन्हाळा तीव्र असल्याने पालकपण मुलांच्या हाती मोबाईल देत घरात बसा असे सांगत होते. पण आता सुट्टी संपली आहे. मुलांनी आता मोबाईल च्या दुनियेतून बाहेर पडत अभ्यासाच्या दुनियेत प्रवेश केला पाहिजे, असे प्रतिपादन महानगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा विश्रामबाग येथे शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव आणि मोफत पाठ्यपुस्तक वितरण समारंभ घेण्यात आला यावेळी ते बोलत होते.

जुबेर पठाण म्हणाले की पूर्वी मुलांना पाठ्यपुस्तक मोफत मिळत नव्हती. पालकांना विकत आणावी लागत होती. आर्थिक स्थिती योग्य नसल्याने अनेकांना जुनी पुस्तके घ्यावी लागत. काही विद्यार्थी तर पुस्तकांपासून वंचित राहत असत. शिक्षणापासून वंचित रहात. त्यामुळे शासनाने मोफत पाठ्यपुस्तक देण्याचा निर्णय घेतला आहे.

सध्या दप्तराचे ओझे कमी व्हावे म्हणून तर एकात्मिक पाठ्यपुस्तकांचा उपक्रम सुरु आहे. पहिल्याच दिवशी राज्यातील सर्व शाळांमध्ये पुस्तके दिली जात आहेत. मिळालेली पुस्तके सर्वांनी जपून वापरावीत. पुस्तकांचे महत्व जाणून घेत त्याचा व्यवस्थित अभ्यास करावा, असे प्रतिपादन महानगर पालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी केले. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका उज्वला कळमकर, शिक्षक पारुनाथ ढोकळे, गणेश बुरा, संगीता भंडारी यांसह सर्व शिक्षक हजर होते.

550 स्क्वे.फूट कलेक्टर NA (प्लॉट) जागा विकणे आहे
नगर-पाथर्डी रोडवरून 100 मीटर अंतरावर सिद्धटेकी शाळेजवळ, नगर-पाथर्डी रोड, चिचार, अ.नगर
8888986160
8308274143

गाळे भाड्याने देणे आहे
पाईपलाईन रोड टच कै.शंकर भाऊ वाणी चौक, बँक ऑफ इंडिया शेजारी
9422223964
9960826767

उत्कृष्ट कंडीशनमधील सेंट्रींगचे मटेरियल भाड्याने मिळेल.
भाडे दरमहा
स्टील प्लेट रु.40/-
स्टील प्रॉब रु.100/-
स्टील स्पॅन रु.150/-
9822530153

ट्रिन बंगलो विकणे आहे
प्लॉट ७५०, बांधकाम ११२५, गणेश कॉलनी, रेणावीकर शाळेजवळ, सावेडीनाका, अ.नगर
9970345186
9175946175

शेडसह जागा भाड्याने देणे आहे
नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर हॉटेल इंद्रायणी समोर, तपोवन रोड टच कॉर्नर वरील १५ हजार स्क्वे.फूट सर्व बाजूनी कंपाऊंड असलेली जागा शेडसह व आरसीसी बांधकामासह भाड्याने देणे.
9689960244

आयुर्वेद हॉस्पिटलसाठी मुलगा आणि सिस्टर पाहिजे
धन्वंतरी आयुर्वेद हॉस्पिटल
विद्या कॉलनी, कल्याणरोड, अ.नगर
9422736300

पाहिजेत IFB
वॉशिंग मशिन कंपनीच्या सर्व्हिस सेंटरसाठी
१०/१२ वी पास / ITI मुले पाहिजेत
ऑफिस कामासाठी लेडिज कोऑर्डिनेटर पाहिजे
पत्ता : मिरजाबाग चौक, पद्मन नगर रोड, सावेडी, अ. नगर
9146416002
9922855124

पाहिजेत
बँकींग व फायनान्स कंपनीसाठी सेल्स मॅनेजर आणि कस्टमर सर्व्हिस एक्झिक्युटिव्ह
पगार १०,००० + इन्सेंटिव्ह
AGS १ ला मजला, ग्रोमरे कॉम्प्लेक्स, सारडा कलेक्शन समोर, गजानन कॉलनी, नवानागपूर, MIDC ,अ.नगर.
7498489681 / 8788121927

पाहिजेत GROOW Consultancy
कॅशियर, सेल्समन, आयटीआय, ग्रॅज्युएटस, डिप्लोमा, सेल्स, अकौंटंट (Tally Prime), मार्केटींग, डिलेव्हरी बॉय
बांगडीवाला ऑफिस
विझनेस सेंटर, प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अ.नगर.
9307182619
gconsultant@gmail.com

कामासाठी मुले पाहिजे
न्यू टिळक रोड, अ.नगर
7350682390

नामांकित टाईल्स्च्या शोरूमसाठी कामासाठी अनुभवी सेल्समन व अकौंटंट पाहिजेत
आशापुरी पगार
न्यू हिमाई शेजारी, बंधन लॉन समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अ.नगर.
9890151515

पाहिजेत
विगेन इंडिया कंपनीच्या अहमदनगर ब्रांच मध्ये ऑफिस कामासाठी मुली /मुले पाहिजेत. शिक्षण १२ वी ते पदवीधर
9764609130

पाहिजेत
* ओ.टी.असिस्टंट : १
* मेडिकल दुकानासाठी : १
अनुभवी मुलगा/मुलगी
होडशीह हॉस्पिटल व प्रसुतीगृह, तारकपूर, अ.नगर
7769959721
भेटण्याची वेळ : दु.१२ ते ३

पाहिजे
* कॉम्प्युटर ऑपरेटर (Tally/ऑपरेटर)
* महिला - २ * पुरुष - २ (अनुभवीला प्राधान्य)
व्ही मनमोहनदास & सन्स (गांधी बी वाले) मार्केटयार्ड, मर्चन्ट बँक शेजारी, अ.नगर
WhatsApp & Call : Mo. 9423791379

पाहिजेत
* हेल्पर : २ जागा (M)
* ऑर्डर बुकिंग । मार्केटींग : २ जागा (M)
शिक्षण : १२ वी अथवा ग्रॅज्युएट । अनुभवी अथवा फ्रेशर्स
सोम एन्टरप्रायजेस शिलाविहार, अ.नगर.
Mo. 9823359012 / 9049269880

पाहिजेत
साईदिप ऑटोमोबाईल्स यांना खालील जागेत त्वरित भरणे आहेत
- PREMIUM SALES EXECUTIVE — Post-2
  पात्रता- ग्रॅज्युएट, ऑटोमोबाईल्स क्षेत्रात १ ते २ वर्षाचा अनुभव तसेच १५० सी.सी. किंवा त्या पुढे टू-व्हीलर विक्रीचा अनुभव आवश्यक
- SALES EXECUTIVE — Post-4
  पात्रता- ग्रॅज्युएट, संभाषण कौशल्य, ऑटोमोबाईल क्षेत्रात सेल्सचा १ ते २ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य, संगणकीय ज्ञान आवश्यक
- FIELD EXECUTIVE — Post-4
  पात्रता- ऑटोमोबाईल क्षेत्रात फिल्ड मध्ये कामाचा २ ते ३ वर्षाचा अनुभव तसेच स्वतःचे टू-व्हीलर व लायसन्स आवश्यक
- TELE CALLER — Post-2
  पात्रता- ग्रॅज्युएट,उत्तम संभाषण चातुर्य,तसम कामाचा २ ते ३ वर्षाचा अनुभव आवश्यक
- SERVICE ADVISOR — Post-3
  पात्रता-डिप्लोमा, तत्सम कामाचा १ ते २ वर्षाचा अनुभव व संगणकीय ज्ञान आवश्यक
- MECHANIC — Post-4
  पात्रता- ITI, ऑटोमोबाईल्स क्षेत्रात १ ते २ वर्षाचा अनुभव आवश्यक
- DRIVER — Post-2
  पात्रता- निर्व्यसनी, टाटा ऐस व टाटा ४०७ चालवण्याचा अनुभव आवश्यक

संपूर्ण माहिती व अर्जा सह तीन दिवसाच्या आत खालील मेलवर अर्ज करावेत किंवा समक्ष भेटावे, वेळ सकाळी ११ ते सांय ५ पर्यंत
SAIDEEP AUTOMOBILES PVT.LTD.
Savedi Naka, Nagar-Manmad Road, A.nagar.Cont.-8983292999

आपल्या हृदयाची काळजी कशी घ्याल ?
रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ
यांच्या मार्गदर्शनाखाली
मोफत हृदयरोग तपासणी शिबीर Cardic OPD प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी
पुढील लक्षणे असणाऱ्या रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा.
छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे.
अहमदनगर येथे गुरुवार दि. २० जून २०२४ दुपारी २ ते ३.३०
सिटी केअर हॉस्पिटल
तारकपूर बस स्टॅण्ड समोर, अ.नगर. फोन : २३२५६४८.
संतोष दरासें (सिनिअर मॅनेजर) 7385195962, 9209632502

VAISHNAVI TILES & TRADING CO.
* सर्व प्रकारच्या टाइल्स * ग्रॅनाइट * सॅनिटरी वेअर * पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग * C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262151515
VARMORA TILES • BATHWARE, KERAKOLL The Green Building Company, CERAMICA, colortile, RAK, NIRAJ BG, India's No.1 TILES, ICON
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
vaishnavitiles1@gmail.com

विकणे/भाड्याने देणे
- शहरालगत मोठा प्लॉट हॉस्पिटल सराफ उडपी हॉटेल, मॉलसाठी कराराने देणे आहे.
- मिस्त्रीनाका येथे गोडाऊन प्लॉट विक्रणे
- बोल्डेमळा सावेडी येथील J.V. मध्ये प्लॉट देणे
- स्वारगेट पुणे येथील १५०० स्क्वे.फूट एल टाईप कॉर्नर शोरूमची जागा भाडयाने/विक्रय देणे आहे.
- शहर मध्यवस्तीत सिफ्ट पार्किंगसहित 1 BHK, 2 BHK फ्लॅट लोन सुविधांसह विक्रय देणे.
- शहर मध्यवस्तीत ६५० चे टायटल ५१०० स्क्वे.फूट असलेली जागा विकणे आहे.
- डॉ.सी.ए.साठी सिफ्ट इराणी लोईंजह ऑफिस भाडयाने देणे आहे.
- बाजारपेठेतील इकान जागा विकणे आहे.
- केडगाव भूषणनगर येथील नवीन रो-हाऊसिंग बंगलो विकणे आहे.

Contact : 9022510584

महावीर कन्स्ट्रक्शन
त्वरित आवश्यकता
- LEGAL ADVISOR — Full Time 1
  Specialization in Property
  Exp : Min 5 years
- COMPUTER OPERATOR — 1
  English, Hindi, Marathi typing compulsory
  Exp : Min 1year
- ARCHITECT — Full Time 1
  Exp : Min 2 yrs
- DRIVER — 1

CONTACT 8482888359
MAHAVIR GROUP
6th Floor, Achanpreme, Near Gov. Polytechnic College, Bursigaon Road, Ahmednagar - 414001

३० वर्षांची यशस्वी शैक्षणिक असलेले सुसज्ज कॉलेज
Bombay Institute of Vocational Training (Diploma & Technical College)
डॉक्टर हॉस्पिटल / बेकरी समोर, वन विभाग कार्यालय मागे, नगर-औरंगाबाद रोड, अ.नगर.मो.-8830685732
प्रवेश सुरु शासकीय नोकरीची पात्रता व ह्मी. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कोर्स
कालावधी : एक वर्ष पात्रता : १० वी, १२ वी, पदवीधर (पास/नापास) मुला/मुलीसाठी शाखा-मराठी/इंग्रजी
बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहायक) (Civil Engineer Assist.) मोठा इंजिनिअर व्हायचं आहे ना? मग काय करायचंय.... मी इंजिनिअर सारखा कसा होणार? कमी खर्चामध्ये व कमी कालावधीमध्ये...हे करी केव्हानंतर जिल्हा परिषद (Z.P.) महानगरपालिका, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग (P.W.D.), लघु पाटबंधारे, रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, म्हाडा, आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, रेल्वे व इतर बांधकाम विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदावर शासकीय नोकरीची संधी, जिल्हा परिषद/म.पा./सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासकीय ठेकेदारांचे (Govt. Civil Contractor) Licence काढता येते रजिस्ट्रेशन रूक शकतो, जिल्हा परिषद मधील कनिष्ठ अभियंत्याचे सहायक या पदावर नामनिर्देशनाने अथवा बदलीने नियुक्ती करण्यासाठी बांधकाम पर्यवेक्षक हा अभ्यासक्रम समकक्ष आहे. सन २००८ ते २०२३ पर्यंत वरील व इतर शासकीय विभागात हा अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदावर (स्केल ९३००-३४,८०० ग्रेड पे ५८००) भरती प्रक्रिया झाली आहे. खासगी नोकरी/स्वतःचा व्यवसाय करता येतो. बयाची अट नाही...त्वरा करा... मर्यादित जागा... उपरोक्त पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची ९०० संधी.

अ.नगर कापड बाजार येथे शॉप्स उपलब्ध
ऑफर मर्यादित कालावधीसाठी, सर्व सुविधांयुक्त, सी.सी. टिव्ही. कॅमेरे, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच वॉशरूमची सुविधा
अशा व्यवसायाची सुवर्ण संधी पुन्हा नाही
9270570699

दि. १ शुक्री-शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक : 14 ते 21 जून 2024
- संघर्ष योध्दा (स्पानी) 11.15 AM, 4.55 PM
- अल्याड पल्याड (स्पानी) 9.10 AM, 8.00 PM
- चंदू चॅंपीयन 8.30 AM, 11.45 AM, 2.10 PM, 5.15 PM, 7.45 PM, 10.30 PM
- मुंजा 8.45 AM, 1.15 PM, 3.45 PM, 8.15 PM, 10.45 PM
- इनसाईड आऊट (3D) Hindi 11.15 AM, 6.15 PM
- मिस्टर अँण्ड मिसेस माही 2.30 PM, 10.30 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow **CONNPLEX** LUXURY THEATRE AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

आमच्याकडे बिल्डींगचे सर्व प्रकारचे कामे महानगरपालिकेच्या मंजूरीसह व नकाशाप्रमाणे मटेरिअलसहीत योग्य दरात करुन मिळतील.
बंगल्याचे सर्व प्रकारची दुरुस्ती (रिपेअरींग) व नुतनीकरण करुन मिळेल.
तसेच टी ॲंगलचे गलडरची कामे मटेरियलसहीत करुन मिळतील.
बांधकाम क्षेत्रातील विश्वसनीय नाव
SONA CONSTRUCTION इंजिनियर अँण्ड कॉन्ट्रॅक्टर कल्याण रोड, अ.नगर
प्रोप्रा. प्रकाश कळमकर (सिव्हील इंजिनिअर)
7020162622
9822310206

२१ जुलै २०२४ अयोध्या दर्शन यात्रा
काशी विश्वेश्वर, प्रयागराज, गया विरुध्दली यात्रा
प्रवास : १० दिवस
* प्रेक्षणीय स्थळे *
उज्जैन, अयोध्या, प्रयागराज, गया, वाराणसी, शिवपुर, शनी अमुनया, गुप्त गोदावरी, ओंकारेश्वर, सेगाव
* प्रतिव्यक्ती *
₹11601/-
2 x 2 आरामदायी स्लीपर कोच बसने प्रवास, निवास व भोजनासह
श्री सुविधा पात्र कंपनी संचालित
AMAR PREM Holidays & Multiple services
श्री. सचिन रामगरुड पाटील, श्री. सुनिल मोहन बाळसे, श्री. विलास मोतनराव बाळसे
श्री. रामकिसन पाटील, श्री. मुरलीधर पाटील, श्री. बाळासाहेब पाटील, श्री. गोपीनाथ पाटील, श्री. रमेश पाटील, श्री. अशोक पाटील, श्री. बाळासाहेब पाटील, श्री. गोपीनाथ पाटील, श्री. सुनिल